# यंदा कर्तव्य आहे

प्रकाश घाटपांडे



# मनोगत

काय! तुम्ही पण अंधश्रद्धाळूच की राव ! लग्नाला एक तप पूर्ण झाल्याचे निमित्त म्हणा औचित्य म्हणा साधून हे पुस्तक प्रकाशित करण्याचा मनोदय मी व्यक्त केल्यावर आमच्या एका स्नेहयांनी ही प्रतिक्रिया दिली. मला मोठी गंमत वाटली. मुहूर्त या प्रकाराविषयी मानसिकता अशी पण रुजत गेली त्याचा हा आगळा वेगळा पैलू. अनेक विवाह संस्था लग्न जुळवताना सर्व प्रकारची मदत करतात. माहिती पुरवतात. पण पत्रिकेला किती महत्व द्यावे असा प्रश्न उपस्थित होतो त्यावेळी तो ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत श्रद्धेचा प्रश्न आहे अशी भूमिका घ्यावी लागते. मग विवाहाचे वेळी पत्रिका जुळते का? हे बघणे ही श्रद्धा की अंधश्रद्धा ? असा प्रश्न मला नेहमी विचारला जातो. प्रश्नकर्त्याला समोरच्याची काय भूमिका आहे हे समजावून घेण्याचा तो एक मार्ग असतो. विचारणारा माणूस संभ्रमात पडलेला असू शकतो. तो विवाहाच्या वेळी पत्रिका बघून निर्णय देणार असेल तर त्याला हा प्रश्न पडू शकतो. कदाचित आपल्या या श्रद्धेला अंधश्रद्धा म्हणून हिणवले गेले असण्याची खंत असू शकते. आपल्या या श्रद्धेला कुणाचा तरी पाठिंबा असण्याची शक्यता अजमावी हा हेतू असू शकतो. काही तरी गुळमुळीत सांगू नका राव ! एकतर श्रद्धा तरी म्हणा किंवा अंधश्रद्धा तरी म्हणा! असे म्हणून समोरच्याला कैचीत पकडण्याचा हेतू असू शकतो. त्या निमित्त काही तरी वादसंवाद घडावा अशीही इच्छा असू शकते.

आपल्या तो बाब्या दुसऱ्याचं ते कार्ट या न्यायाने माझी ती श्रद्धा इतरांची ती अंधश्रद्धा! माझी श्रद्धा ही समाजाला हानिकारक नाही म्हणून ती अंधश्रद्धा ठरत नाही. श्रद्धा ही आत्मिक बळ देते. श्रद्धा असावी पण अंधश्रद्धा नसावी. या पद्धतीची मांडणीही समाजात होताना दिसते.

परंतु तसे पाहिले तर श्रद्धा ही मुळातच अंध असते. त्या मुळे अंधश्रद्धा म्हणजे पिवळा पितांबर म्हटल्या सारखे आहे. चिकित्सेशिवाय ठेवलेला विश्वास म्हणजे श्रद्धा. तसेच चिकित्सेशिवाय एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवण्याचे नाकारणे ही पण एक श्रद्धाच! विश्वास हा पुराव्यावर आधारलेला असतो. त्यामुळे त्याची चिकित्सा होउ शकते. श्रद्धेची चिकित्सा होत नाही. म्हणूनच विवाह ठरवताना पत्रिका बघावी की नाही ? हे कोणी अमुक प्रसिद्ध व्यक्ति सांगते म्हणून न ठरवता संबंधितांनी स्वत: पत्रिका बघण्याची, जुळविण्याची पद्धत समजून घेउन मगच ठरवावे एवढीच या पुस्तकाच्या निमित्ताने नम्र विनंती.

प्रकाश घाटपांडे

prakash.ghatpande@gmail.com

मॅरेज इज नेसेसरी ईव्हल अशी एक म्हण आहे.

त्यावर विश्वास बसावा अशीच परिस्थिती अवती भवती आहे. कुटुंब बनण्याची सुरवात विवाहापासून होते. विवाहसंस्था हा समाजरचनेचा एक अपरिहार्य भाग आहे. विवाह हा स्त्री-पुरुष मीलनाचा एक समाजमान्य मार्ग आहे. परस्पर सहजीवन ,प्रजनन, कुटुंब,धर्माचरण,लैंगिक उपभोग यासाठी आवश्यक असलेली ती समाजरचनेची गरज आहे. भारतीय विवाह संस्थेचा इतिहास बघितला तर तो अतिशय मनोरंजक आहे. ज्या पद्धतीची लग्नं आज निषिद्ध मानली जातात ती सुद्धा वैदिक काळात कोणत्या ना कोणत्या प्रचलित विवाह पद्धतीनुसारच होती असे आढळते. वैदिक काळात विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत.

१) **ब्राम्ह विवाह:-** हे वैदिक मान्यता असलेले म्हणजे शास्त्रसंमत असलेले सालंकृत कन्यादान होय. आजचा वैदिक विवाह हाच आहे. हा सर्वश्रेष्ठ प्रकार मानला गेला.

२) **दैव विवाह:-** यज्ञासाठी बोलविलेल्या ऋत्विजाला आपली कन्या देणे याला दैव विवाह म्हटले आहे.

३) **आर्ष विवाह :-** धर्मकारणासाठी गाय व बैल हे वधूपित्यास देउन ती कन्या आपली करुन घेणे. हा कन्याविक्रय ठरला तरी तो धर्मकारणासाठी असल्याने तो मान्य आहे.

४) **प्राजापत्य विवाह** :- प्रजापती या देवतेस उद्देशुन केलेला धर्म अर्थ व काम या त्रिकाणात राहून केलेला विवाह. तरी ब्राम्ह व दैव पेक्षा कमी प्रतीचा व आर्षपेक्षा जास्त प्रतीचा हा प्रकार मानला आहे.

वरील सर्व प्रकार ब्राम्हण वर्णापुरते मर्यादित होते.

५) **आसूर विवाह**:- हा सर्व वर्णासाठी असलेला प्रकार यात वधूच्या नातलगांना यथाशक्ती द्रव्य देउन स्वच्छंद पणे केलेला विवाह प्रकार. धर्माचरण हे येथे गौण आहे.

६) **गांधर्व विवाह** : - सर्व वर्णांना हा प्रकार खुला आहे. इथे स्त्री पुरुषांची मने जुळली की बास आहे बाकी सबकुछ चलता है। सर्व गोष्टींना इथे कार्योत्तर मंजूरी घेण्याची सोय आहे.

७) **राक्षस विवाह** :- मनगट शाहीच्या जोरावर एखादी कन्या पळवून आणून जबरदस्तीने विवाह करणे म्हणजे राक्षसविवाह. हा फक्त क्षत्रिय वर्णास करता येतो.

८) **पैशाच विवाह** :- हा प्रकार म्हणजे बलात्काराला विवाह म्हणून दिलेली मान्यता असे म्हटले तर वावगे ठरु नये. हा अर्थातच वर्ज्य मानला आहे.

आजही या सर्व गोष्टी समाजात दिसून येतात. परंतु समाज जसा जसा विकसित होत गेला तस तशा त्यातील छटा बदलत गेल्या. पूर्वी नाडीपरीक्षा, अश्वपरीक्षा, रत्नपरीक्षा अशा परीक्षा जशा होत तशा वधूवर परीक्षा सुद्धा धर्मशास्त्राचा भाग होता. त्यात आरोग्य , स्वभाव, कुलाचार, अंगलक्षण,वय इ.गोष्टी विचारात घेतल्या जात. विवाहात ज्योतिषशास्त्राचा विचार हा स्वतंत्रपणे न करता ज्योतिष हे धर्माचे अंग असल्याने त्या भूमिकेतून केला जात असे. भारतीय ज्योतिष हे नक्षत्राधिष्ठित आहे. प्रचलित ज्योतिषशास्त्र हे वराहमिहिर पासून म्हणजे इ.सन ५०० च्या आसपास अस्तित्वात आले. प्रचलित पत्रिका मेलन पद्धती ही त्या नंतरच्या काळातील आहे. थोडक्यात ती पंधराशे वर्षांपेक्षा जास्त जुनी नाही.

## सद्यस्थितीतील विवाह पद्धती

मुलगा किंवा मुलगी शिक्षण संपल्यानंतर थोडेसे स्थिरस्थावर झालेवर विवाह योग्य झाले असे समजण्यात येते. साधारण पणे आपल्या समाजात मुली २० ते ३० या वयोगटात व मुले २३ ते ३५ वयापर्यंत विवाहयोग्य ठरतात. मुलामुलींचे पालक हे आपल्या पाल्याचा विवाह जुळविण्यासाठी नातेवाईक, परिचित यांना सांगून वधूवर सूचक मंडळात नांव नोंदवतात. त्यानुसार प्रथम व्यावहारिक बायोडाटासह तयार असलेली पत्रिका व फोटो हे प्राथमिक स्तरावर पाठविल्या जातात. अजून ही पुरुषप्रधान संस्कृती असल्याने बऱ्याच वेळा मुलीची बाजूच जास्त करुन ही माहिती पाठविते. मग पत्रिकेला किती महत्व द्यायचे हा प्रश्न उपस्थित होतो. आम्हाला पत्रिका पहायची नाही असा ठाम आग्रह धरणारे दोन टक्केच असतात असा अनुभव मंडळांचा असतो. म्हणजे अठठयाण्णव टक्के लोकांना पत्रिका हवी असते. स्थळ व्यावहारिक दृष्टया नाकारायचे असेल तर पत्रिका जुळत नाही हे सांगणे उभयपक्षी सोयीस्कर असते. इथपासून विवाहात पत्रिका पुराण चालू होते.

## पत्रिकेचे गुणमेलन म्हणजे काय?

वधूवरांच्या पत्रिका या विवाहाच्या अनुषंगाने एकमेकींशी किती जुळतात हे पहाणे म्हणजे गुणमेलन. गुणमेलन ही संकल्पना वैवाहिक जीवनासाठी वधू-वर एकमेकास अनुरूप आहेत किंवा नाहीत हे ठरवण्यासाठी निर्माण झाली असावी. प्रेम , त्याग, सांमजस्य, या गोष्टी सुखी वैवाहिक जीवनास पोषक असतात. दोन भिन्न प्रकृतीची माणसं जर एकत्र आली तर वैवाहिक जीवनाचा समतोल ढासळतो. तसे होउ नये म्हणून त्यांच्या प्रकृतीचे मूल्यमापन पत्रिकेच्या माध्यमातून करून त्याचा निष्कर्ष सांगण्याचा प्रयत्न गुणमेलनाद्वारे केला गेला असावा.

पत्रिका-गुणमेलन करताना वधू वरांच्या पत्रिका शेजारी ठेवून त्यातील राशी नक्षत्राच्या आधारे एकूण आठ विभागात गुणांची मांडणी होते. बारा राशींची ब्राम्हण , क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशा चार विभागात केलेल्या वाटणीला वर्ण म्हणतात. मानव , चतुष्पाद,जलचर,वनचर व कीटक अशा प्रकारे जी विभागणी केली त्याला वश्य म्हणतात. तारा म्हणजे वधू व वर यांचे मधील नक्षत्रात्मक अंतर. योनी म्हणजे

नक्षत्रांची केलेली अश्वयोनी, गजयोनी, मार्जारयोनी, मूषकयोनी, अशा एकूण १४ प्रकारे केलेली विभागणी. ग्रहमैत्री म्हणजे राशीस्वामी असणाऱ्या ग्रहांची परस्पर असलेली मैत्री. त्यातून घेतलेले मित्रत्व समानत्व वा शत्रुत्व. गण ही नक्षत्रावरून केलेली देव , मनुष्य व राक्षस या प्रकारात केलेली विभागणी होय. राशी कूट म्हणजे वधूवरांच्या राशीतील परस्पर अंतर. नाडी ही नक्षत्रा नुसार आद्य, मध्य व अंत्य अशा तीन प्रकारात केलेली विभागणी आहे. या विभागांनुसार वर्णगुणाला १, वैश्यगुणाला २, तारागुणाला ३, योनिगुणाला ४, ग्रहमैत्री गुणाला ५ , गणगुणाला ६, राशीकूटगुणाला ७ आणि नाडीगुणाला ८ अशा चढत्या क्रमाने गुण दिलेले असून सर्व गुणांची बेरीज ३६ होते. वर्ण , वश्य, ग्रहमैत्री व राशीकूट हे चार विभाग राशीनुसार पाडले असून त्यांची एकूण १५ गुण होतात. नक्षत्रानुसार तारा ,योनी गण व नाडी हे चार विभाग असून त्यांचे एकूण २१ गुण होतात. असे राशी व नक्षत्र मिळून ३६ गुण होतात. एकंदरीत, परीक्षेसाठी असलेल्या अभ्यासक्रमात कुठल्या टॉपिकला किती गुण हे जसे दिलेले असते तसाच इथे प्रकार आहे. हे सर्व गुण वधू-वरांच्या पत्रिकेत चंद्र कुठल्या नक्षत्रात कितव्या चरणात आहे यावर ठरलेले असते. त्यासाठी पंचांगात रेकनर सारखे कोष्टक असते. ते पाहून ३६ पैकी १८ पेक्षा अधिक गुण जमले तर विवाह जमवण्यास हरकत नाही असा निकष असतो. थोडक्यात पन्नास टक्क्याचेवर मार्क मिळाले तर पास !

ज्योतिर्विभूषण प्रा. अरविंद बर्वे ग्रहसंकेत 'राष्टीय ज्योतिष संमेलन विशेषांक १९९७` मध्ये म्हणतात, " केवळ वधूवर राशी नक्षत्रावरुन गुणमेलन होते. यासाठी वधूवरांच्या पत्रिकाच बघाव्या लागत नाहीत! ही आश्चर्य वाटणारी पण सत्यस्थिती आहे. गुणमेलनात विवाह करायचा की नाही हे केवळ राशिनक्षत्रावरुन ठरते. पण मोठेमोठे सुशिक्षितही यालाच पत्रिकामेलन समजतात हे मोठेच दुर्दैव होय. गुणमेलन हे पत्रिका न पहाताच केलेले पत्रिकामेलन आहे. बहुसंख्य महाराष्टीयन ( व अन्य प्रांतीय लोकही ) आजही याच भ्रामक अशास्त्रीय अपूर्ण, रुढ व परंपरागत गुणमेलनाच्या अंधश्रद्धायुक्त जोखडात अडकलेले आहेत. एखाद्या आजारी माणसाला बरा करण्यासाठी डॉक्टरला दाखवावे लागेल. डॉक्टरलाही त्याचा नुसता चेहरा पाहून भागणार नाही. तपासावे लागेल. वाटल्यास इतर आवश्यक चाचण्या, तपासण्या कराव्या लागतील. नंतरच रोगनिदान करुन उपचार होउ शकतात. वधूवरांच्या केवळ राशिनक्षत्रे पाहून पत्रिका (?) जमविणे म्हणजे रोग्याचा केवळ फोटा पाहून त्यावरुन डॉक्टरने औषधोपचार करण्याहून अधिक हास्यास्पद नाही काय? म्हणजेच गुणमेलन हे केवळ पत्रिका जुळवण्याचे नाटक आहे. कारण त्यासाठी प्रत्यक्ष पत्रिका उघडाव्याच लागत नाही. याचाच अर्थ गुणमेलन म्हणजे पत्रिकामेलन नव्हे.

आता प्रसिद्ध व लोकप्रिय अशा पंचांगात सुद्धा गुण मोजण्यात एकवाक्यता नाही. गुण मेलन कोष्टकाचे बाबतीत सर्वोत्तम म्हणता येईल असे एकच पंचांग आहे ते म्हणजे जन्मभूमी गुजराथी पंचांग. कर्क वधू व सिंह वर यांच्या नउ जोडयांपैकी दाते पंचांगाने तीनच जोडयांचे मेलन होते परंतु जन्म भूमी पंचांगाच्या गुणमेलन कोष्टकाच्या आधारे नउपैकी सर्वच्या सर्व १८ गुणाचे वर मेलन होते गुणमेलन छापताना अलीकडे पंचांगकर्ते कोष्टकात जमणाऱ्या गुणांसह असणाऱ्या दोषांचाही आवर्जून

निर्देश करु लागले आहेत सर्व सामान्याना ज्ञान देण्याच्या उदात्त हेतू ( ?) धरुन जरी हे दोष छापले असतील तरीही हा दिशाभूल करण्याचा किंवा बुद्धीभेद करण्याचा प्रकार होत आहे.``

एक प्रथितयश ज्योतिषी श्री.श्री. भट हे आपल्या 'ज्योतिषाच्या गाभाऱ्यात` या पुस्तकात म्हणतात, " विवाह पहाताना ठरविताना पत्रिका पाहणार नाही असा प्रचार केला जातो. तरुणांनी स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेऊ नये. वैवाहिक जोडीदार कोण असणार हे अटळ प्रारब्ध असते त्यात ज्योतिष हे निमित्त असते. `` तर दुसरे मान्यवर ज्योतिषी श्री. व.दा.भट 'भाग्य` दिवाळी ९७ च्या अंकात म्हणतात, " मी स्वत: ज्योतिषी असलो तरी एक गोष्ट प्रांजलपणे कबूल केली पाहिजे की वधूवरांची कुंडली जुळते अगर जुळत नाही या बद्दल हमखास अनुभवास येतील असे , ज्यावर पूर्ण विसंबून रहावे असे कोणतेही नियम नाहीत. पत्रिका जुळते अगर जुळत नाही या शब्दांना वास्तविक अर्थ नाही.

ज्योतिषी लोक विवाहसंस्थेत मानसिक गोंधळ घालण्यात पुढे असतात. विवाह घटनांमध्ये कुंडलीसंबंधाने भाष्य केव्हा, कधी कोणापुढे करावे याचे भान त्यांना नसते. विवाह निश्चित झाला असता, ठरला असता, साखरपुडा वगैरे गोष्टीपर्यंत प्रगती झाली असता पत्रिकांचा विचार बंद करावा. काही पालक भीतीपोटी, द्विधा मन:स्थितीपोटी किंवा काही प्रसंगामुळे एखाद्या ज्योतिषाला अशा परिस्थितीतही पत्रिका दाखवतात. ज्योतिषी नको त्या वेळेला नको ते भाष्य करतात! आणि मग गोंधळाला पारावार रहात नाही. नुसती धावपळ! या ज्योतिषाकडून त्या ज्योतिषाकडे धाव! साखरपुडा लग्न मोडावे की करावे ? रात्रंदिवस चिंता, घरात सर्वावर मानसिक दडपण! एखादा सामान्य ज्ञानाचा ज्योतिषी एवढा गोंधळ घालू शकतो असे दिसले की वाटते ज्योतिषशास्त्राचा विचार विवाहसंस्थेत नसला तर बरा! कमीत कमी कुटुंबप्रमुखाने पालकांनी एका विशिष्ट मर्यादेनंतर कुंडलीचा मुद्दा , विषय बंद करणे आवश्यक असते आणि ज्योतिषांनीही अशा वेळी नसते भाष्य करण्याचा मोह टाळला पाहिजे!

फलज्योतिषशास्त्राने निर्माण केलेले सामाजिक जीवनातील परिणाम विवाह संस्थेच्या बाबत जास्त तीव्रतेने आढळतात. रूढी , संस्कार एकदम झुगारुन देण्याइतपत मानसिक शक्ती सामान्य व्यक्तीची नसते. मुलामुलींचे विवाह ठरविताना 'जन्मकुंडली` चा विचार हा तसाच आहे. वास्तविक, संपूर्ण ज्योतिष शास्त्र हे शिफारसवजा आहे. सुखी वैवाहिक जीवनासाठी जन्मकुंडल्या पाहिल्याच पाहिजे असा दंडक किंवा नियम नाही. पाहिल्यास उत्तम एवढाच त्याचा अर्थ! मुलामुलींचे विवाह करताना कधी नव्हे ती जन्मकुंडलीची आठवण येते कारण आपले वडील, आजोबा पाहत असत आपणही ही परंपरा पाळावी, एक घराण्याची रुढी!

विवाह ही अत्यंत आनंदाने मनावर कोणतेही दडपण आणून न घेता साजरी करावयाची घटना! पण सध्याच्या ज्योतिषशास्त्राचा विवाह संस्थेतील सहभाग हा केवळ दु:ख , चिंता निर्माण करणारा , मनात कोठेतरी किंतू निर्माण करणारा आहे. सुखाच्या व आनंदाच्या काळाला आपल्या अगाध ज्ञानाने गालबोट लावण्यापलिकडे ज्योतिषी काहीही करीत नाहीत. परंपरेने , रुढीने मनावर झालेले चुकीचे संस्कार दूर सारून आनंदाने विवाह करावा.``

एकूण काय गुणमेलन करण्याच्या पद्धती या वाद ग्रस्त आहेत. त्यात अंतर्विसंगती आहेत.त्यामुळे त्याला ज्योतिषशास्त्रीय चौकटीत सुद्धा सर्वमान्यता नाही. ३६ गुण जुळूनही विवाहसौख्य नसलेली उदाहरणंही दिसतात. तर पत्रिका न पाहताही उत्तम वैवाहिक जीवन जगणारे लोक दिसतात. त्यावर काही ज्योतिषी म्हणतात की प्राक्तन हे जर आम्हाला सर्व कळालं असतं तर आम्ही ब्रम्हदेव झालो नसतो का? शेवटी प्राक्तन कुणाला टळलं आहे का ? प्रयत्न करणं हे आपल्या हातात आहे. श्रद्धाळू माणसांना हे युक्तिवाद बिनतोड वाटतात.

**एकनाड**

आमच्या एका मित्राच्या लग्न जुळविण्याचे वेळी प्रथेप्रमाणे काही कुंडल्या व फोटो बायोडाटासह येऊन पडल्या होत्या. मित्राचे वडील त्याचे सॉर्टिंग करीत होते. त्यातील काही पत्रिका त्यांनी प्राथमिक फेरीतच बाद केल्या. ते म्हणाले , " स्थळ चांगली आहेत पण एकनाड आहे. त्यामुळे बाद कराव्या लागल्या.`` त्यांना पंचांगाची परिभाषा थोडीफार समजत होती. एवढया भांडवलावर असलेले ज्योतिषज्ञान एकनाड समजण्यास पुरेसे होते. पाच अधिक पाच बरोबर दहा हे सांगायला रॅन्गलर व्हावे लागते काय? एकनाड असल्यास संतती होत नाही अथवा अडचणी येतात हा ठाम समज! पूर्वी रक्तगट समजण्याची सोय नसल्याने आपले पूर्वाचार्य एकनाड पहात असत असा वैज्ञानिक मुलामाही काही लोक देतात.

खरं तर या समजुतीत काहीही तथ्य नाही. फलज्योतिषात नाडी या शब्दाचा नेमका अर्थ काय ते कुठेही स्पष्ट सांगितलेले नाही. एकनाड-दोषामुळे होणारे दुष्परिणाम वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे सांगितले आहेत. नाडीग्रंथात नाडी म्हणजे एक पळाचा अवधी. शरीरशास्त्रात नाडी म्हणजे रक्तवाहिनी. फलज्योतिषात अमुक नक्षत्रावर जन्मलेल्या माणसाची नाडी अमुक एवढेच सांगितले आहे. अंत्य , आद्य, मध्य अशा तीन प्रकारच्या नाड्या सांगितलेल्या आहेत. जगातला प्रत्येक माणूस या तीनपैकी कोणत्या तरी एका नाडीचा असतोच. पंचांगात अवकहडा चक्र नावाचे एक कोष्टक असते. त्यावरून जन्मनक्षत्राच्या आधारे तुमची नाडी कोणती ते कळते. उपवर मुलगा व मुलगी या दोघांची नाडी एकच आहे असे दिसले तर तिथे एकनाडीचा दोष आहे म्हणून त्या दोघांचे लग्न करू नये कारण अशा जोडप्याला संतती होत नाही अशी वेडगळ श्रद्धा प्रचलित आहे. वधूवरांची नक्षत्रे आद्यनाडीत असता वियोग, मध्यनाडीत असता दोहोचा नाश व अंत्य नाडीत असता वैधव्य व अतिदु:ख अशी फळे काही ग्रंथात दिली आहेत. पत्रिका-गुणमेलनात नाडीला सर्वात जास्त म्हणजे आठ गुण दिले आहेत. एकनाड असता नाडीचे शून्य गुण अन्यथा थेट आठ गुण असा मामला आहे नाडीचा संबंध रक्तगटाशी जोडण्याचा प्रयत्न काही ज्योतिषीलोक करतात पण तो त्यांचा कावेबाजपणा आहे. का ? ते पहा. रक्तगट हे अे, बी, अेबी, ओ, आरएच पॉझिटीव्ह व निगेटीव्ह असे एकूण आठ प्रकारचे आहेत. तीन नाडया व आठ प्रकारचे रक्तगट यांचा कुठेही गणिती ताळमेळ बसत नाही.एकनाड-दोषामुळे जोडपे निपुत्रिक रहाते ही समजूत जर खरी असती तर संभवनीयतेच्या नियमानुसार जगातली एक-तृतीयांश जोडपी

निपुत्रिकच राहिली असती! पण तसे काहीच आढळत नाही. यावरून उघड दिसते की ही समजूत म्हणजे एक खुळचटपणा आहे. एकनाड-दोषाला काही अपवाद गर्गसंहितेमध्ये दिले असले तरी पूर्वीच्या व आजच्याही ज्योतिष्यांच्या अडाणीपणामुळे म्हणा किंवा अंधानुकरणाने म्हणा किंवा स्वार्थामुळे म्हणा एकनाडीचे फालतू स्तोम माजले आहे.

एकनाड-दोषावर आजवर झालेल्या टीकेचा एक परिणाम असा झालेला दिसतो की आता दाते पंचांगात नाडी-दोषाचे वेगळेच परिणाम सांगण्यात येवू लागले आहेत. तिचा संबंध आता संततीशी नसून माणसाच्या स्वभावाशी जोडण्यात आला आहे, संतती बाबत मौन पाळण्यात आले आहे, पण एकनाडीमुळे मृत्यूदायक दोष निर्माण होतो अशी दहशत आता नव्याने घातली आहे ! दुसरा महत्वाचा बदल म्हणजे एकनाड दोष ठरवण्यासाठी आख्ख्या नक्षत्राऐवजी त्याचा फक्त एक चरणच विचारात घ्यावा असे नरपतिजयचर्या स्वरोदय या ग्रंथाचा आधार देउन सांगितले आहे. या बदलामुळे एकनाड दोषाच्या केसेसचे प्रमाण एकदम खाली येउन ते फक्त २५ टक्क्यावर येते असा दावा केला आहे. पण या प्रकाराचा खरा अर्थ काय होतो ते पहा. गेली शेकडो वर्षे चालत आलेल्या रूढीमुळे ७५ टक्के केसेस मध्ये निष्कारणच एकनाड-दोष मानून स्थळे नाकारली गेली असाच याचा अर्थ होत नाही का ? आम्ही तर म्हणतो की एकनाड-दोष ही कल्पनाच मुळी कालबाहय झाली असल्यामुळे तिच्याकडे सरळ दुर्लक्ष करावे.

### नक्षत्रदोष

मूळ नक्षत्रावर जन्मल्यावर शांती करावयास सांगतात. मूळ नक्षत्र हे तमोगुणी, दारूण, अनिष्ट मानले गेले आहे. त्यामुळे मूळ नक्षत्रावर मूल जन्मले तर ते आईबापाच्या मूळावर आले आहे असा समज निर्माण झाला. 'शामभट्ट ( एक नामांकित जोशी ) आणि त्याचा शिष्य बटो यांचा वृत्तांत ` या चिंतामण मोरेश्वर आपटे लिखित १८९३ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकात फलज्योतिष हाच एक विषय सामाजिक कादंबरी साठी घेतलेला आहे. त्यात गोविंदपंत यांना झालेला मुलगा हा मूळ नक्षत्रावर झाला असल्याने ते बापास अनिष्ट आहे असे शामभटाने त्यांना सांगितल्यावर मुलाचा त्याग करणे हाच एक पर्याय शिल्लक राहीला. त्यानुसार त्यांनी तो त्याग केला. पुढे कादंबरीत शिवाजी महाराजांनी या प्रकारचा छडा लावला या कादंबरीतील हकिगती मूळातूनच वाचण्यासारख्या आहेत. दोष आला म्हणजे पुढे परिहार वगैरे गोष्टी आल्या. त्यातला अनिष्ट भाग काढून टाकण्यासाठी त्याची शांती करण्याचे प्रकार अर्थातच भीतीपोटी निर्माण झाला. संत एकनाथ मूळ नक्षत्रावर जन्मले. त्यांनी एके ठिकाणी लिहून ठेवले आहे.

**मूळीच्या मूळी एका जन्मला । मायबापे घोर धाक घेतला ।**

**कैसे नक्षत्र आले कपाळा । स्वये लागला दोहोच्या निर्मूळा ।**

शांती हे कर्मकांड भट भिक्षुकांच्या उपजिविकेचे साधन होते. त्यामुळे अशा प्रकारची कर्मकांड जाणीवपूर्वक जोपासली गेली व गतानुगतिकतेचा भाग म्हणून त्याचे अंंधानुकरण झाले.

मूळ नक्षत्र हे सासऱ्यास वाईट आश्लेषा नक्षत्र सासूस वाईट , ज्येष्ठा नक्षत्र दिरास वाईट या गोष्टींचा उगमही याच पद्धतीने आहे. गंमत म्हणजे याच नक्षत्रांचे वेगवेगळे भाग पाडून त्याची फले वेगवेगळी दिलेली आहेत. ती धनवान, दानशूर मंत्री अशी पण आहेत. तसेच ग्रंथकार बदलेले की फलेही बदलतात. काही ग्रंथकारांनी विशाखा व मघा या नक्षत्रांची काही चरणे ही दीर व सासरा यांचेसाठीही मारक म्हटले आहे. मुलगी सासरी आल्यानंतर जर काही दुर्घटना घडली तर त्याचे खापर लगेच मुलीच्या पायगुणाशी जोडून काहीतरी उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच कुठतरी नक्षत्राशी संबंध जोडून काहीतरी बादरायण संबंध प्रस्थापित केला जातो. शंभर आश्लेषा नक्षत्राच्या मुली सून म्हणून घरी आल्यावर त्यातल्या नव्वद सासवा वारल्या असे कुणी सप्रमाण सिद्ध केले आहे काय ? एखाद्या घरात आश्लेषा नक्षत्राची मुलगी सून म्हणून आली आणि जर योगायोगाने त्या घरातील सासू वर्षभरात या ना त्या कारणाने वारली तर हा समज इतका घट्ट रुजतो की विषाची परिक्षा कशाला घ्या?

## मृत्यू षडाष्टक

मंगळाच्या दहशती शिवाय ही आणखी एक दहशत आहे. समजा तुमची जन्मरास मेष आहे व तुम्हाला सांगून आलेल्या जोडीदाराची रास कन्या आहे. मेषेपासून कन्या रास ६ वी येते. कन्येपासून पुढे मोजल्यास मेष रास आठवी येते. सहा-आठ म्हणजे षडाष्टक. पत्रिकेतील षष्ठ स्थान ह शत्रूचे आणि अष्टम स्थान हे मृत्यूचे आहे. असा योग असलेल्या जोडीदारांचे एकमेकाशी पटत नाही अशी समजूत आहे. षडाष्टक शब्दामागे मृत्यू हा शब्द जोडला म्हणजे एकदम दहशत निर्माण होते. ज्योतिषांना तेच हवे असते. ते अशी समजूत घालतात की मृत्यू शब्दाचा अर्थ वैवाहिक सुखाचा मृत्यू असा घ्यायचा. हाच अर्थ शास्त्रकारांना अभिप्रेत आहे. ज्योतिष्यांचे एकूण धोरण काय तर विवाह या गोष्टीसंबंधात मंगळ, मृत्यूषडाष्टक, एकनाड असे काहीतरी प्रश्न वा अडचणी आपणच आधी निर्माण करायच्या व आपणच त्याला 'शास्त्राधार` देउन मार्गदर्शन करण्याचा आव आणायचा व स्वत:च्या तुमड्या भरायच्या. काही षडाष्टकांमध्ये दोन्ही राशीचे राशीस्वामी एकच असतात किंवा त्यांची मैत्री असते अशावेळी ती षडाष्टके मृत्यू षडाष्टके न होता प्रीती षडाष्टके होतात व ती ग्राहय धरली जातात. उदा. मेष पासून आठवी रास वृश्चिक त्यामुळे षडाष्टक झाले पण दोहोचा राशीस्वामी मंगळ हा एकच असल्याने मृत्यू षडाष्टक ही विसंगती होईल म्हणून हे झाले प्रीती षडाष्टक.

## विज्ञाननिष्ठ गुणमेलन ?

आपल्याला आई , बाप, भाउ, बहिण निवडीचे स्वातंत्र्य नाही. कारण या बाबी जन्माधिष्ठीत आहेत. आपल्या आई बापांचा धर्म , जात पंथ हा त्यांच्या पोटी मिळालेल्या जन्मामुळे आपल्याला चिकटतो.

आपला जन्म ही आपल्या हातातील बाब नाही.पण वैवाहिक जोडीदाराची निवड ही आपल्या हातातील बाब आहे. हे आपल्याला व्यवहाराने दिलेले स्वातंत्र्य आहे. प्रत्यक्षात हे स्वातंत्र्य जोडीदाराचे रंगरुप , शिक्षण व्यवसाय या व्यतिरिक्तच्या इतर बाबतीत मिळविण्यास प्रत्यक्ष विवाहेच्छुकच उदासीन असतात. रंगरुप शिक्षण व्यवसाय या बाबतीत आग्रही भूमिका घेणारे विवाहेच्छुकच मुहूर्त , पत्रिका, देणीघेणी, जातीपाती या बाबतीत मात्र सोयीस्करपणे वडीलधाऱ्यांचे म्हणणे शिरोधार्य मानतात. स्वतःची स्पष्ट व आग्रही भूमिका घेण्याचे टाळतात. खरं तरं वैवाहिक जीवन सुखी असण्यासाठी सामंजस्य , त्याग हवा, गुणमेलनापेक्षा गुणमीलनाची जास्त आवश्यकता आहे हे मर्म काही आधुनिक ज्योतिषांनी ओळखले. त्यांनी गुणमेलनाची वेगळी पद्धत अवलंबली आहे. यात ते वधूवरांच्या पत्रिका घेवून त्या व्यक्तिमत्व , आरोग्य, आयुर्मान, या पातळींवर एकमेकाशी जुळते का नाही हे स्वतःच तारतम्याने ठरवतात व त्यानुसार निर्णय देतात. ज्योतिषशास्त्रात काळानुरूप बदल केले पाहिजेत आजच्या वैज्ञानिक युगात जुने ते सोने असे म्हणून चालणार नाही , ज्योतिष हे देश, कालवर्तमानानुसार वर्तवले गेले पाहिजे असे म्हणून ज्योतिषाला आधुनिक विज्ञानाची जोड देउन ही मंडळी वैद्यकीय तपासणीचाही सल्ला देतात. सर्व व्यावहारीक गोष्टी जुळत असतील तरच ही मंडळी पत्रिका जुळत असल्याचा फलज्योतिषकीय मानसिक आधार देतात. यात वैज्ञानिक दृष्टिकोण बाळगल्याचे तथाकथित समाधान व परंपरा टिकवल्याचेही समाधान जातक व ज्योतिषी दोघांनाही मिळतं.

## मंगळाची दहशत

पूर्वी मुलीच्या बापाला मुलगी म्हणजे एक भार त्यातून मुलीला मंगळ असला की विचारायलाच नको. अशावेळी एखादे गुरूजी कम ज्योतिषी कम मध्यस्थ ही मुलगी खपवायचे काम कुशलतेने करीत असत. हे ज्योतिषी कम मध्यस्थ राहू , केतू शनी इत्यादि ग्रहांना जाब विचारून मंगळदोष परिहार करून ही मंगळी खपवत असत. अशा मध्यस्थीतून त्यांना बराच फायदा होत असे. साहजिकच मंगळाचा बागुलबुवा जोपासला गेला कारण त्यात हितसंबंध गुंतलेले असायचे. त्यामुळे विवाहाच्या सौदेबाजीत मंगळ हा एक हुकमी पत्ता ठरला.

सांगून आलेल्या मुलाची / मुलाची पत्रिका मंगळाची आहे किंवा नाही हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज भासत नाही. किरकोळ आजारासाठी आपण लगेच डॉक्टरकडे धावतो का ? आपल्याला घरगुती वा प्राथमिक उपचार माहीत असतात. तद्वत हा मंगळाचा प्रथमोपचार अनेकदा माहीत असतो. घरात धार्मिक प्रथमोचाराचे अंग म्हणून टांगलेल्या पंचांगात तो दिलेला असतो. जन्मकुंडलीत १ ,४,७,८,१२ यापैकी कुठल्याही स्थानात मंगळ असेल तर तो मंगळदोष आहे असे समजले जाते. ताऱ्यांना जशी तेजाची प्रत असते तशी या मंगळालाही प्रतवारी आहे. कडक मंगळ , सौम्य मंगळ, क्षम्य मंगळ वगैरे. ही प्रतवारी पत्रिकेत मंगळ किती पॉवरफूल आहे यावरून ठरवली जाते.

मंगळदोष म्हटला की वैवाहीक सौख्याचा बोऱ्या , वैधव्य असा समज आहे. उगीच विषाची परिक्षा कशाला घ्या! 'मंगळ्या`ला मंगळी नसली तरी चालते पण मंगळीला मात्र मंगळ्याच लागतो.

जन्मकुंडलीतील बारा स्थानापैकी जर पाच स्थानात मंगळ म्हणजे जवळजवळ चाळीस टक्के जागा या मंगळाने व्यापली आहे. मग विवाह जमणे मुश्कील होईल म्हणून पूर्वाचार्यांनी सौम्य मंगळ , क्षम्य मंगळ अशी उपाययोजना करून ठेवली आहे. मंगळाचा इतिहास हा काही फार प्राचीन नाही. मंगळदोषाचे उल्लेख हे मुहूर्त गणपती , मुहूर्त चिंतामणी, भाव चिंतामणी, ज्योतिर्महार्णव अशा ग्रंथांमध्ये आढळतात. मुहूर्तचिंतामणी हा ग्रंथ रामभट या ज्योतिषाने श्री क्षेत्र काशी येथे शके १५२२ मध्ये लिहिला. या ग्रंथामध्ये मंगळदोषासाठी अपवादही निर्माण केले. वधुच्या पत्रिकेत जर वरील स्थानापैकी मंगळ असून वराच्या पत्रिकेतही त्याच वरीलपैकी स्थानात असेल तर मंगळाने मंगळास जाब पाहिला असे म्हटले जाते. आखाड्यातील पहिलवान जशी एकमेकाची ताकद अजमावत असतात त्या पद्धतीने वधूवरांच्या पत्रिकेत मंगळ एकमेकांना जाब विचारतात. अशा त-हेने मंगळ्याला मंगळी जमून जाते. आखिर लोहा लोहोको काटता है ना! नंतरच्या ग्रंथकारांनी जाब विचारण्याचे अधिकार हे शनी , राहू, केतू यांना दिले आहेत. पत्रिकेतील गुरू , शुक्र हे ही शुभ ग्रह आपापल्या स्टेटस नुसार नैतिक दबाव आणू लागले. मेष, कर्क, वृश्चिक, धनु, मीन या राशीही मंगळाला आंजारू गोंजारू लागल्या. पत्रिका गुणमेलनात जर २७ किंवा त्यापेक्षा अधिक गुण झाले तर मंगळाकडे काणाडोळा करू लागले अशा रितीने मंगळाचे अपवाद वाढू लागले. अनेक ज्योतिषांनी सुद्‌धा मंगळ हे खूळ आहे अशी सडेतोड भूमिका घेतली. या मध्ये वि.गो.नवाथे, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, द्वा.ना. राजे, ज्योतिषाचार्य सुंठणकर इत्यादि मान्यवर लोकांचा समावेश आहे.

## ज्योतिषाचार्य सुंठणकरयांची मते

ज्योतिषाचार्य सुंठणकरांनी तर मंगळदोषाचे स्तोम ज्योतिषांनीच माजवले आहे असे म्हणून 'विवाह मंगळाची अनावश्यकता ` या १९६६ साली लिहिलेल्या पुस्तकात ज्योतिष शास्त्राच्या चौकटीत राहूनच ज्योतिषांचा खरपूस समाचार घेतला आहे. या पुस्तकाला आशिर्वाद पर प्रस्तावना संकेश्वर पीठाचे शंकराचार्य लिहताना म्हणतात, " ही पुस्तिका वाचून विवाह जुळते समयी वधूवरांच्या कुंडलीतील १ , ४, ७, ८, व १२ या स्थानातील मंगळ पाहून कोणीही घाबरुन जाउन विवाह मोडण्याची मुळीच जरुर नाही , एवढा अर्थबोध जरी झाला तरी पुस्तिका लिहिल्याचे सार्थक झाले.``

या पुस्तिकेत सुंठणकरांनी तर मंगळदोषाला १०७ फलज्योतिषशस्त्रीय अपवाद ग्रंथाधारे दिले आहेत. ते म्हणतात, ''भौगोलिक परिस्थितीसुद्धा मंगळदोषाचा परिहार करतात.

**गोदावरीदक्षिणतीरवासिनां भौमस्य दोषा नहि विद्यते खलु ।**

अर्थ :- गोदावरी नदीच्या दक्षिण प्रदेशात स्थाईक असणाऱ्यांना मंगळ दोष मानू नये. हे एक संस्कृत वचन ज्योतिर्माणव ग्रंथात दिले आहे. त्याचप्रमाणे

**कलिंगनामा यमुनांशमालवौ सुमागधः सिंधुसुभोजसौ नृपाः ।**

**अमीरस्युरंशोग्रहजन्म देशकासस्थैव ते स्युः फलदायका ग्रहाः ।।**

ज्योतिष संग्रह या ग्रंथातील वरील शास्त्राधाराचा आशय असा की सूर्याचे जन्मस्थान कलिंग देश , चंद्राचे जन्मस्थान यमुना तीर , मंगळाचे जन्मस्थान मालवदेश , बुधाचे जन्मस्थान मगध देश , गुरुचे आणि शनीचे जन्मस्थान सौराष्ट्र देश या ग्रहाचे जन्म प्रदेश शास्त्रात सांगितले असून त्या त्या ग्रहांचे परिणाम त्या त्या प्रदेशांवर विशेषत्वाने होत असतात. या अनुषंगाने मालव देशात तेवढाच मंगळ पहावा व बाकीच्या प्रदेशात मंगळ दोष मानू नये. या शिवाय धर्मशास्त्र असो वा ज्योतिषशास्त्र असो दोष आला म्हणजे परिहार वा तोडगा आलाच. मंगळाची शास्त्रोक्त शांती , विष्णु उपासना, शुचिर्भूतपणे मंगळाचा किमान १० हजार जप , मंगळजपाने अभिमंत्रित प्रवाळ रत्नाची अंगठी इत्यादी मुळे मंगळदोषाचा परिहार होतो. वैधव्याच्या भीतीतून मुक्त होण्यासाठी सावित्रीव्रताचे आचरण ही सांगितले आहे. त्या शिवाय कुंभविवाह धर्मसिंधुमध्ये सांगितला आहे. वैधव्य हराः कुंभ विवाहः। वैधव्य टाळण्यासाठी विवाहापूर्वी मातीचा कुंभ घेउन त्यात विष्णुप्रतिमेची विधीपूर्वक स्थापना करावी. त्याची प्रार्थना करुन प्रतिमेसह तो कुंभ जलाशयात वा नदीकाठी फोडून तो विसर्जित करावा. म्हणजे कुंभरुप पतीशी विवाह होउन वैधव्यादियोग कुंभासमवेत नाश पावतात. नंतर मानवी पतीशी विवाह करावा.

तसे पाहिले असता उपरोक्त पाच स्थानात मंगळ असता वैवाहिक जीवन विफल होते अगर त्यात विघ्ने येतात हा लोकापवाद म्हणजे एक खूळच आहे. वैवाहिक जीवनात मंगळ विघ्ने आणू कसा शकतो हे शास्त्रीय दृष्टया गूढच आहे. बरे ज्या ज्योतिषशास्त्राने मंगळाच्या पद्धतीचा पुरस्कार केला त्या शास्त्राने उपरोक्त पाच स्थानापैकी प्रत्येक स्थानात कोणती विविक्षित फळे अनुभवास येतात याचा खुलासा अवश्य करावयास पाहिजे होता. म्हणजे या मंगळाच्या पद्धतीत विश्वासनीयता व निश्चिती आली असती. ज्यानी ही पद्धत पुरस्कारली त्यांनी या पद्धतीची तपशीलवार व सुसंगत फलमीमांसा अशी स्पष्ट केली नाही हे एक आश्चर्य होय. या दोन्ही पक्षाना ज्योतिषशास्त्राने अज्ञान अंधारात चाचपडत ठेवले आहे. जनता काय किंवा ज्योतिर्विद काय दोघेही निव्वळ अंधश्रद्धेने वा अंधानुकरणाने या मंगळाचा पाठपुरावा करीत असतात. मंगळ का पहायचा याची चिकित्सा कोणीही करीत नाही. करायची म्हणजे या पद्धतीस निश्चित अशी शास्त्रीय पार्श्वभूमी नाही. एवढे असूनसुद्धा जनता व ज्योतिषी या पद्धतीचा पिच्छा सोडण्यास तयार नाहीत. भारतीय जनतेत रुढीप्रियतेचा गुण वसत असतो. त्याचे प्रत्यंतर म्हणजे मंगळाची पद्धती होय. मंगळाच्या पद्धतीचे ठाम स्वरुप व निश्चित परिणाम कोणासही स्पष्टपणे ठाउक नाहीत व ते जाणून घेण्याची जिज्ञासाही विशेषसे कोणी दाखवत नाही. नाही पेक्षा मंगळ समस्या एवढी जाचक होउन बसली नसती. मेंढरे जशी अंधानुकरणाची प्रवृत्ती ठेवतात तद्वत समाज अंधानुकरणाने अनभिज्ञपणे वागतो. अशीच ही रुढी 'महाजनो येन गतस्सः पंथाः` या न्यायाने शतकानुशतके बागुलबुवा होउन समाजाकडून जोपासली गेली आहे.

या बागुलबुवाची दखल घ्यावयाची कोणी? तर ज्योतिर्विदांनी! ती आजपर्यंत कधी घेतली गेली नाही व अशी दखल ते घेणेही संभवत नाही. आजपर्यंत कोणा ज्योतिर्विदाने वैवाहिक जीवनात विविध

विघ्नांचे उगमस्थान मंगळच आहे असे मंगळाच्या पद्धतीचे रहस्य उकलून समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न केलेला नाही. अर्थात तसा तो करताही येणार नाही व केल्यास शास्त्र व प्रत्यक्ष अनुभूती यांच्या कसोटीवर तो उतरणारही नाही. ही त्रिकालाबाधित वस्तुस्थिती आहे.समाजात मंगळाचे खूळ पसरवून ठेवून ते जोपासले जाईल असा एक सतत प्रयत्न करण्यात ज्योतिर्विदांनी चांगलाच हातभार लावला आहे. बिचारी अंधश्रद्धाळू व भाबडी जनता अवगत नसलेल्या ज्योतिषशास्त्रास प्रमाण मानण्यापेक्षा त्या शास्त्राचे प्रतिनिधित्व व परिशिलन करणाऱ्या ज्योतिर्विदावर विश्वास , भरवसा ठेवून चालते. ज्योतिर्विदांनी सांगितलेले मार्गदर्शन भाविकपणे प्रमाण मानायचे अशी प्रवृत्ती सामान्य जनात वसत असते. ही पद्धती चिकित्सक दृष्टिने न अभ्यासता अंधानुकरणाने ज्योतिषांनी एकमेकापासून उचलली असून आजतागायत या पद्धतीच्या प्रचारास खतपाणी घालण्याचे महान व्रत त्यांनी घेतले आहे. मंगळाच्या पद्धतीच्या फलसंहितेचा खुलासा करुन घेण्याची जिज्ञासा आजपर्यंत ज्योतिषांनी दाखविली नाही. यदाकदाचित मंगळाच्या पद्धतीचा बाष्कळपणा समाजास उकलला तर ज्योतिषी लोकांचा व्यवसाय फार मोठया प्रमाणात मार खाईल अशी साधार भीती त्यांना वाटत असल्यास न कळे! ज्योतिष कार्यालयांच्या उत्पन्नाचा फार मोठा वाटा या मंगळाने उचलला असल्याने ज्योतिर्विद मंडळी या पद्धतीच्या भंपकपणाकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करीत असतील असे म्हणणे धाडसाचे ठरणार नाही.

मंगळाचे जाब मंगळ, रवि,राहू केतू व शनि या ग्रहांच्या योगान पाहिला जातो हा सिद्धांत काटयाने काटा काटा काढण्याच्या न्यायावर आधारलेला आहे. एखाद्या व्यक्तीच्या शरीरातील एखाद्या विविक्षित अंगात काटा मोडला असता काटा घेउन दुसऱ्या जोडीदाराच्या शरिरातील त्याचा विविक्षित अंगातून तो काटा काढतां म्हणणे बाष्कळपणाचे व हास्यास्पद ठरते. तद्वतच एखाद्या कुंडलीतील अनिष्ठ मंगळ दुसऱ्या कुंडलीतील १,४,७,८,१२ या स्थानात असणारे शनि, मंगळ, राहू, केतू, रवि आदि ग्रह जाब पहातात म्हणून तो सुनिष्ठ ठरतो असा सिद्धांत प्रतिपादणे असंयुक्तिक व अशास्त्रीय होय.

आणखी एक महत्वाचा मुद्दा म्हणजे जन्मवेळेची अनिश्चितता. अनिश्चित जन्मवेळेनुसार तयार केलेल्या कुंडलीनुसार मंगळ पद्धती परिक्षिली जाते. पूर्वी घडयाळे नव्हती. असल्यास जन्मवेळ अनिश्चित आधारांवर नोंदवली जात असे. अंदाजे जन्मवेळेवरुन केलेल्या कुंडल्या विश्वसनीय नव्हेत. अशा कुंडलीवरुन मंगळ पद्धती पाहण्यात हाशील कोणते आहे ? दुसरा मुद्दा असा की मंगळ पद्धती संपूर्ण चुकीच्या मार्गाने गावंढळपणे तपासली जाते. स्पष्टग्रह भावचलित कुंडली प्रमाणे मंगळ पहावा हा रास्त शास्त्रीय राजपथ! पण सिद्धांतानुसार अनुसरुन चालावे कोणी ? स्पष्ट ग्रहभावचलित कुंडली करणारे ज्योतिर्विद दुर्मिळ! त्यातही अशा कुंडल्या जनतेच्या खिशास परवडणाऱ्या नव्हेत. मग भावचलित स्पष्ट ग्रह कुंडल्यानुसार झटपट रंगारी पद्धतीच्या मंगळ पद्धतीस तसे तिचे प्रचारक दलाल जे ज्योतिषी याना दुर्घट असलेला या शास्त्रीय मार्गाचे वावडे असल्यास नवल नाही. प्रत्येक वेळी साध्या कुंडलीपेक्षा भावचलित स्पष्टग्रह कुंडलीनुसार 'खुलासेवार मंगळ ` तपासून घेण्याची दलाली सामान्य जनतेच्या ऐपतीबाहेरची आहे. तात्पर्य मंगळ पाहण्याची दिशा चुकीची , अशास्त्रीय, ढोबळ आहे. मंगळ पाहणेच

चुकीचे! मग ते चुकीच्या मार्गाने पहाणे साफ घोडचूक ठरते. मंगळ पद्धती समाजाची नाहक दिशाभूल करुन आपल्या "दलाला`` मार्फत गरीब जनतेस नाडवीत असते याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

जगात अगणित विवाह होत असतात. भारत सोडल्यावर सर्व जगभर मंगळ पद्धती विचारात न घेता विवाह जमत असतात. मंगळ पद्धती सर्व जगातल्या लोकांना कशी भोवत नाही ? का फक्त भारतीय जनतेच्या बोकांडी बसण्याचा तिचा हेका आहे ? सदा सर्वदा पृथ्वीतलावर थोडयाशा लोकांना वैवाहिक जीवन विफलतेचा फटकारा बसत राहणार या निसर्गक्रमास थांबवण्याची ताकद मंगळ पद्धतीच्या कुवतीच्या बाहेरची आहे.``

ज्योतिषाचार्य द्वारकानाथ ना.राजे आपल्या 'जातक दीप` पुस्तकात म्हणतात, " आमचे मते मंगळाचे जे प्रचलीत खूळ आहे त्यात काही अर्थ नाही. मंगळाचे गुणदोष , राशिस्थान व दृष्टियोग यानेच ठरवावे व ते जातकशास्त्रास अनुसरून असावे.``

ज्योतिषी ह.ने काटवे आपल्या 'मंगळ विचार` पुस्तकांत म्हणतात, " आपल्या देशात विवाह जमविताना वधुवरांचा मंगळ पहाण्याचा प्रघात आहे. या मंगळा बद्दल सर्व मुहूर्त ग्रंथातून विवेचन केलेले आहेच. मंगळ पहाण्याची आजची जी पद्धत आहे ती अत्यंत हास्यास्पद आहे.``

मंगळदोष ही अंधश्रद्धा आहे असे काही आधुनिक ज्योतिषी सांगतात. अहो मंगळ हे धडाडी , कार्यक्षमता, यंत्रकुशलता यांचे प्रतिक. पूर्वीच्या काळात स्त्रीचे स्थान घरात होते. चूल आणि मूल. एकत्र कुटुंब पद्धती होती. अशी धडाडीची स्त्री सून म्हणून आल्यावर कुटुंबकलह वाढेल म्हणून पूर्वाचार्यांनी तो दोष मानला. आताच्या जगात तो गुण मानला पाहिजे. कर्तृत्ववान स्त्री मंगळप्रधान असते. ज्योतिषाचे कालसुसंगत अर्थ लावले पाहिजेत. पत्रिका नीट तपसावी लागते. त्यात अॅक्यूरसी असली पाहिजे. कॉम्प्यूटराईज्ड ऍनालिसिस पाहिजे अन्यथा ऍनालिसिस चुकण्याचा संभव असतो. असे सांगणारा ज्योतिषी आपल्याला विज्ञाननिष्ठ वाटतो.

भारतीय ज्योतिषात मंगळ हा पुरुष पापग्रह असून तो क्रूर असा सेनापती आहे. तो तमोगुणी , क्षत्रिय, अग्नी तत्वाचा असून त्याची देवता ही षडानन आहे. नवग्रहांमध्ये रवि , चंद्र व गुरु हे त्याचे मित्र असून शुक्र व शनि यांचेशी तो तटस्थ आहे मात्र चंद्र हा त्याचा शत्रू आहे. ग्रीक संस्कृतीत सुद्धा मंगळाला युद्धाचीच देवता मानले आहे.

खगोलशास्त्राच्या मते हा मंगळ सूर्यमालेतील पृथ्वीनंतरच्या कक्षेतील एक ग्रह आहे. पृथ्वीच्या साधारणपणे निम्म्या आकाराने असलेल्या या ग्रहाला दोन चंद्र आहेत. सूर्याभोवती फिरण्यास त्याला ६८७ दिवस लागतात आणि स्वत:भोवती तो २४ तास ३७ मिनिटे व २३ सेकंदात फिरतो. पृथ्वीवर

माणसचे वजन १०० किलो असेल तर मंगळावर ते ३८ किलो भरेल. तो लालसर रंगाचा दिसतो त्याचे कारण तेथे असलेले लोहाचे ऑक्साइड. मंगळावर जीवसृष्टी असण्याचा पुरावा अद्यापपर्यंत उपलब्ध नाही. पूर्वी तेथे पाणी असावे असे पुष्टी मिळणारे संशोधन अलिकडे केलेल्या अमेरीका व ब्रिटनच्या मंगळावर पाठविलेल्या मानवविरहीत यांनांच्या मोहिमांवरुन होउ लागले आहे. मंगळावरील मोहिमां पूर्वी तेथे प्रगत अशी जीवसृष्टी असावी असा समज होता. तेथील मानवसदृश प्राण्याला 'मंगळया' असे नांव देउन जगात अनेक मनोरंजनात्मक विज्ञानकथा लिहिल्या गेल्या.

अशी कल्पना करायची की, सूर्यापासून प्लूटोपर्यंत पसरलेली आपली संपूर्ण सूर्यमाला एका रुपयाएवढ्या लहानशा वर्तुळात मावेल एवढी लहान केली आहे. ही रुपयाच्या आकाराची सूर्यमाला एका विस्तीर्ण मैदानात मध्यभागी ठेवली आहे. आता या प्रमाणावर, म्हणजे स्केलवर, ग्रह-नक्षत्रांच्या तार्‍यांची मांडणी मैदानात करायची आहे. त्यासाठी त्या रुपयाच्या भोवती ३०० फूट त्रिज्येचे एक वर्तुळ काढायचे. या वर्तुळाच्या आत एकही तारा नाही. त्याच्या बाहेर पसरलेल्या विस्तीर्ण मैदानात मैलभर अंतरापर्यंत डोळ्यांना दिसू शकणारे राशी-नक्षत्रांचे तारे विखुरलेले आहेत. मृग नक्षत्रातला व्याधाचा तारा ५५० फूट अंतरावर आहे. काही नक्षत्रांचे तारे दीड-दोन हजार फूट अंतरावर आहेत. आता जरा आपल्या रुपयाकडे पहा. त्यावर कुठेतरी आपली पृथ्वी व चंद्र एका तिळाएवढ्या लहानशा जागेत आहेत असे समजायचे. पृथ्वीवर उभे राहून चंद्राकडे पहाणारा म्हणत असतो की मला चंद्र आत्ता मृग नक्षत्रात दिसतो आहे , वास्तविक तो बापडा चंद्र कुठे असतो आणि ते मृग नक्षत्र कुठे असते! तरी पण फलज्योतिषात असे म्हणायचे असते की माझ्या जन्मवेळी चंद्र मृग नक्षत्रात दिसत होता म्हणून माझे जन्मनक्षत्र मृग. या नक्षत्राचा मालक कोण तर मंगळ , म्हणून मला जन्मतः मंगळाची महादशा चालू झाली! तो पत्रिकेत १,४,७,८ व १२ स्थानात आहे म्हणून मुलगी झाली मंगळी.

## मुहूर्ताच्या निमित्ताने.....

आता पत्रिका जुळते आहे, एकमेकांची पसंती आहे, इतर व्यावहारिक गोष्टी जमताहेत म्हणल्यावर नंतर येतो तो मुहूर्ताचा टप्पा. मुहूर्त म्हणले की भास्कराचार्य-लीलावतीची गोष्ट हमखास सांगितली जाते. लीलावती ही भास्कराचार्यांची लाडकी लेक. तिच्या कुंडलीत वैधव्ययोग होता. पण भास्कराचार्यांनी असा विवाहाचा मुहूर्त शोधून काढला की तिचा वैधव्ययोग टळेल. पण विवाहाचे वेळी अक्षतेचा दाणा घटिकापात्रात डोकावून पहात असताना नकळत पडलेने तो तळाशी जावून भोकात अडकला व मुहूर्त चुकला व शेवटी व्हायचे तेच झाले. या दंतकथेच्या छटा बदलतात पण आशय तोच. मुहुर्ताची महती. थोडा इकडेतिकडे झाले की काय उलथापालथ.

## इ.स. २००० मे,जून मध्ये विवाहमुहूर्त नाहीत- दाते पंचांग

मे महिना म्हणजे सुट्टी ,लग्नसराईचे दिवस. आता या काळात लग्नाचा मुहूर्त नाही म्हणजे गैरसोयच नाही का? कार्यालयाची उपलब्धता हा पण एक सध्या महत्वाचा मुद्दा आहे. मुहूर्त असलेल्या तारखांना कार्यालय मिळणे हे देखील भाग्य. पंचांगात रेडीमेड मुहूर्त दिलेले असतात. पण हे रेडिमेड मुहूर्त सुद्धा 'लाभतात` की नाही हे बघावे लागते. कारण रेडिमेड कपडे सुद्धा सर्वांनाच 'फिट` होतील असे नाही. त्याला कधी कधी 'अल्टर` करावे लागते. तसेच मुहूर्ताचे आहे.एखादी वेळ ही कुणासाठी आनंदाची असते तर कुणासाठी तीच वेळ दु:खाची असते , कुणाची कसोटीची असते तर कुणाची निवांतपणाची असते , कुणाची जोडायची असेल तर कुणाची तोडायची असेल , कुणाची जन्माची असेल तर कुणाची मृत्यूची असेल. कुणाची कशीही असो ती ग्रहांच्या सोयीची असते म्हणून ती मुहूर्त असते. आता पेपरमध्ये बातमी आली होती की या वर्षी म्हणजे इ.सन २००० मे ,जून मध्ये मुहूर्त नाहीत म्हणून. कारण त्या काळात गुरू,शुक्राचा अस्त आहे. विवाह, मुंज, गृहप्रवेश वगैरे महत्वाचे प्रसंगी गुरु या शुभ ग्रहाची साथ आहे की नाही हे पहातात. हे मंगल प्रसंग असतात त्यामुळे अशा प्रसंगी अमंगल ग्रहांची वाकडी नजर पडून काही अमंगळ होउ नये म्हणून गुरुबळ बघितले जाते. गुरु हा ग्रह नैतिक बळ देतो , चांगले गुण वृद्धिंगत करतो. गुरु जर अनुकूल नसेल तर गुरुच्या सुवर्ण प्रतिमेचे पूजन करून तो अनुकूल करून घेता येतो. शुक्र,गुरू यांचा अस्त याचा अर्थ एवढाच कि त्यांची पृथ्वी सापेक्ष स्थिती ही सूर्याच्या जवळ असल्याने ते सूर्याबरोबर उगवतात व सूर्याबरोबरच मावळतात. त्यामुळे ते दिसू शकत नाहीत या अर्थाने त्यांचा अस्त झाला. खरंतरं ही एक दरवर्षी घडणारी खगोलशास्त्रीय घटना आहे. जशी अमावस्येचे वेळी चंद्र सूर्याबरोबरच उगवतो व सूर्याबरोबरच मावळतो त्यामुळे तो आपल्याला दिसत नाही. याला चंद्र सूर्य युती असेही म्हणतात. आपल्याकडे जरी अमावस्या अशुभ असली तरी दक्षिणेत मात्र ती शुभ मानतात. कारण युतीमुळे चंद्राची फळे ही वृद्धिंगत झाली. म्हणजे मुहूर्त ही बाब स्थलसापेक्ष झाली. मुहूर्त ही खरी म्हणजे कार्याच्या सोयीची पूर्वनियोजित वेळ. पण त्यात शुभाशुभत्व एवढं घट्ट चिकटले की ते त्यातून बाजूला काढताच येत नाही. त्यातून हे पंचांगात दिलेले रेडिमेड मुहूर्त हे तार्किक पातळीवर सुद्धा टिकत नाहीत. तरी पण केवळ ठरविलेला मुहूर्त पंचांगात नसल्याने लग्नाची तारीख बदलण्याचा प्रसंग मी पाहिलेला आहे. तारीख ठरली , कार्यालय ठरलं पण मध्येच मुलाच्या काकू/मावशी पैकी कुणालातरी साक्षात्कार झाला की ठरवलेला मुहूर्त पंचांगात नाही.त्यांना बरच समजावयाचा प्रयत्न केला. अहो गुरूजींनी वधूवरांच्या पत्रिका पाहून मुहूर्त काढलाय.पंचांगात नसेना का? पण नाही. मग काय ? तारीख बदला. आता आली का पंचाईत ? दुसऱ्या तारखेला हॉल बुक करा. नशीबानं म्हणजे योगायोगानं ती तारीख त्याच हॉलसाठी उपलब्ध झाली म्हणून ठीक नाहीतर मुलीकडच्यांचे पैसे पाण्यात. विवाहासारख्या महत्वाच्या संस्काराचे वेळी गुरू शुक्रासारख्या शुभ ग्रहांची उपस्थिती नाही म्हणजे त्यांचे आशिर्वाद, नैतिक बळ नाही मग मंगळ शनिसारख्या दुष्ट ग्रहांचे चांगलेच फावले की? कुणाला वैधव्य दे,कुणाचे सासू-सासरे मार,कुणाला अपघात कर, कुणाला सासुरवास कर. मग काही नडलय का मुहूर्त नसताना लग्न करायची?

**रूईकर पंचाग असल्यावर मुहूर्ताची काळजी कशाला?**

आता एखाद्या पंचांगात जर मे ,जून मध्ये मुहूर्त नाहीत म्हणून काय त्या काळात लग्न व्हायचीच नाहीत असे थोडे आहे. ज्यांना कसही करून करायचचं आहे ते कशाला मुहूर्ताची वाट बघतायतं ? पण ज्यांना करायची तर इच्छा आहे पण मुहूर्ताची रूखरूख वाटू नये त्यासाठी रूईकर पंचांग लगेच पुढे सरसावले त्यांनी याकाळात सुद्धा 'शास्त्राधार` देउन मुहूर्त दिले आहेत. असे एखादे धर्मसंकट कोसळले की शास्त्राधार शोधले जातात व ते मिळतातही. या शास्त्रांच अगदी कायद्या सारखं आहे वाटा तेवढया पळवाटा. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला धर्मपंडितांनी नकार दिल्यावर सुद्धा काही धर्मपंडितांनी 'शास्त्राधार` शोधून त्यावर तोडगा काढलाच ना! मग एवढा द्राविडी प्राणायम करत बसण्यापेक्षा आपल्याच सोयीचा आधार घेतला तर काय वाईट?

**सिंहस्थ आणि विवाह मुहूर्त**

सिंहस्थात विवाह करू नये असे म्हणतात. सिंहस्थ याचा अर्थ असा की, गुरु जेव्हा सिंह राशीत असतो तो काळ. गुरु एका राशीत वर्षभर असतो. गुरु हा संततीचा कारक ग्रह मानला गेला आहे. गुरुलाच संतती देण्याचा मक्ता कुणी दिला याविषयी खुलासा सापडत नाही. तसे सर्वच ग्रहाचे कारकत्व कुणी ठरविले यालाही समर्पक उत्तर नाही. केवळ ग्रंथप्रामाण्य हेच त्याचे उत्तर आहे. पण गुरु हा संतती कारक ग्रह आहे याविषयी मात्र ज्योतिषांचे एकमत आहे. तर सिंह रास ही वंध्या रास मानली गेली आहे त्यामुळे संततीकारक ग्रह गुरुच जर या काळात वंध्या राशीत असेल तर या काळात विवाह केल्यास संतती होत नाही असा समज दृढ झाला. परंतु प्रसिद्ध ज्योतिषी श्री. के. केळकर यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कुंडल्यांवरून जो सर्व्हे केला त्याचे निष्कर्ष मात्र या समजुतीच्या विरुद्ध आहेत. आक्टोबर १९४३ ते सप्टेंबर १९४४ या सिंहस्थ-काळात विवाहित झालेल्या १०२ दांपत्यांपैकी ९३ दांपत्यांना संतती झाली , तसेच आक्टोबर १९५५ ते आक्टोबर १९५६ या सिंहस्थ-काळात विवाहित झालेल्या १७४ दांपत्यापैकी १६५ दांपत्यांना संतती झाली , असे त्यांना आढळून आले. यावरून वरील समज बिनबुडाचा आहे हे सिद्ध होते. (संदर्भ :- ग्रहांकित जाने १९९१.)

**आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार?**

समजा एवढ सगळं करून जर मुहूर्तावर गोष्ट केली आणि त्यात अपयश आलं तर मग काय ? त्यालाही उत्तर आहे. जर तुमच्या जन्मकुंडलीतच जर विवाहसौख्य नाही तर कितीही मुहूर्त पाहिले तरी जे

आडातच नाही ते पोहऱ्यात कुठून येणार ? तुमच्या जन्मकुंडलीतच जर वास्तूसौख्य नाही तर कितीही वास्तू शास्त्रानुसार घर घेतल आणि मुहूर्तावर गृहप्रवेश केलात तरी काय उपयोग. एक वास्तूशास्त्री कम ज्योतिषी म्हणतात," माझे कडे जे येतात त्यांची मी प्रथम पत्रिका बघतो व त्यात वास्तूसौख्याचा योग असेल तरच तुम्हाला वास्तूच्या अल्टरेशनसाठी सुचवतो. विनाकारण कुणाला खडयात घालत नाही. `` एका ज्योतिषाला एकदा मी विचारल , " काहो आता विज्ञानाला प्रसूतीची वेळ सहज पुढे मागे करता येते. मग चांगल्या मुहूर्तावर जन्माला घालणे सहज शक्य आहे. मग जन्माला येणाऱ्या बालकाची जन्मवेळ बदलणे तुमच्या हातात आलं. म्हणजे भविष्य बदलणं आपल्या हातात आलं की ? `` त्यावर त्यांनी शांतपणे सांगितलं की , " अस जन्माला येणे हे निसर्गाला धरून नसलेने त्या ठिकाणी जन्मकुंडलीचे नियम तिथे लागू होत नाहीत. `` निवडणुकीचे फॉर्म सुद्धा मुहूर्तावर भरणे जरूरीचे मानतात. उगाच पनौती नको.प्रचाराचा प्रारंभसुद्धा मुहूर्तावरच होतो. कुणीतरी एकच उमेदवार निवडून येणार हे सर्वांना जरी माहीत असले तरी आपण आपल्याबाजूने काळजी घ्यावी. त्यातूनही अपयश आलचं तर नशीब,प्राक्तन आहेच.

महात्मा फुल्यांनी गेल्या शतकात विचारल होतं की का हो आपल्याकडे एवढी पत्रिका गुणमेलन करून मुहूर्त पाहून लग्न करतात तरी बाल विधवांचे प्रमाण जास्ती का ? आणि तिकडे युरोपात गोऱ्या मडमा असे काही न करता लग्न करतात तरी तिकडे असे का नाही ? साधी गोष्ट आहे आपल्याकडे बालविवाहाची पद्धत रूढ होती.साथीच्या रोगांमुळे बालमृत्यूचही प्रमाण जास्ती होतं साहजिकच बालविधवांचे प्रमाण जास्तच असणार. इथं कुठं मुहूर्त आणि पत्रिका आल्या.

## खेडयातील सोयरीक आणि मुहूर्त

'काका येक काम हुतं?

'बोला.`

'सोयरीक जुळवायची होती?`

'काय नांव?`

'इसारले का काका मी बाबू डोंगरा.`

'अरे तुझ नाही तुझया पोराचं.`काका खेकसतात.

'खंडू.`

'अन पोरीचं?`

'इंदी.`

काका हातांच्या बोटांवरील पेरांवर अंगठयाने गणित करत सांगतात.

'नाही जमतं.`

'नाही जमतं ? कसं नाही जमंत ? अहो मामाचीच प्वार हाये. शिकल्याली बी हाये. आमचा ठोंब्या यव्हाराला लई कच्चा. म्हन्ल प्वार तरी जरा शिकल्याली करावी. श्येतात बी कामाला चांगली आहे. आजकाल येटाळन्यांना बी कुठं मान्स मिळत्यात. आपला घरचा मानुस असल्याला बरा. म्हनून म्हन्लं औन्दा द्यावा उडवून बार. बरं मंग जलमनावावरून नसंन जमत तर मंग चालू नांवावरून पघा. तिला अलका बी म्हन्त्यात. पघा पघा जरा बाडात. काही तरी तोडगा असनंच की.`

काका परत पंचांगात बघतात व जुळत असल्याचे सांगतात. कारण बाबू डोंगऱ्याला तीच पोरगी सून म्हणून करायची आहे हे त्याने ताडलेले असते. राहिला फक्त जुळतय का नाही हे बघण्याचा सोपस्कार. मग कशाला जुळत नाही म्हणून सांगा शेवटी लग्न आपल्यालाच लावून द्यायचं आहे. खेडेगावांत बहुजन समाजात बराचसा वर्ग लग्न जुळवण्यासाठी गावच्या बामनाचा सल्ला घेतात कारण ज्योतिष हे धर्माचं अंग आहे. मग सोयरीक ठरण्याचा कार्यक्रम असा नसतोच. काकांनी मुहूर्त काढून दिला की त्याचा उपयोग पत्रिका छापण्यासाठी काहीतरी दिनांक व वेळ द्यावी लागते म्हणून होतो. प्रत्यक्षात त्या मुहूर्तावर लग्न कधीच लागत नाहीत. प्रत्यक्ष लग्नाची वेळ व मुहूर्त यातील अंतर कितीही तासांचे असू शकते. मुलीच्या मामाने मुलीला घेउन या असे सतरावेळा लाउडस्पीकर वर सांगितल्यावर जमेल तशी ती बोहल्यावर उभी रहाते. मुहूर्त टळून गेल्याचा ना काकांना खेद ना व-हाडी लोकांना. शेवटी व-हाडी मंडळींच्या सोयीनेच लग्न लागते.

### विवाह, पत्रिका आणि वास्तव

या विवाहाच्या मार्केट मध्ये शिरलो की आपल्याला निरनिराळे संवाद ऐकायला मिळतात.

"आमच्या वेळी एवढं पत्रिकेचं नव्हतं हो! आमचं लग्न त्या वेळी सुद्धा पत्रिका न बघता झालं. पण आता मुलीच्या लग्नाला बघायला लागतीये! तशी आम्ही बनवून ठेवली होती. काढली माळयावरुन. इतक्या ठिकाणी दाखवली पण अजून जमतच नाही.``

" अहो एकनाडी मुळे प्राध्यापकाचं स्थळ गेलं. त्यानं स्वतःच पत्रिका बघितल्यावर नाही म्हणून सांगून टाकलं. इलॅस्टिकच्या जमान्यात अजून एकनाड टिकून आहे.``

" आता पत्रिका जमणाऱ्या या चार मुलींतून सिलेक्शन करायचंय. सगळीच स्थळं तोलामोलाची आहेत. त्यातल्या त्यात कुठंली जरा जास्त जमतीये तेवढं बघा म्हणजे एकदा शिक्कामोर्तब करायला बरं.``

लग्नाच्या मार्केट मध्ये काळाची गरज ओळखून आता वधू -वर सूचक मंडळे इंटरनेटवर आली आहेत. तेथे मॅच मेकिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. "गुरुजींकडून पत्रिका जुळवणं वगैरे म्हणजे जरा मागासच वाटत बाई. आम्ही आपलं कॉम्प्युटराईजड मॅच मेकींग करुन घेतो. `` असेही सूर ऐकायला मिळतात. ई मॅरेजला ई ज्योतिषी हवाच. पंडित मंडळींनी आता इंटरनेटवर आपली कार्यालय थाटलीत. वेदिक ऍस्ट्रॉलॊजीचं एन्शंट इम्पॉर्टन्स कळायला इंटरनेटवरच यावं लागतं. पिकतं तिथं विकत नाही ना!

आपल्या गप्पांमध्ये सुप्रसिद्ध लेखक डॉ अनिल अवचट एकदा म्हणाले , " सुनंदाशी लग्न करताना परस्पर घरच्यांनी पत्रिका जुळते का नाही हे बघितले. वडिलांना एका ज्योतिषाने सांगितले कि मुलीची पत्रिका जुळत नाही तुम्ही हे लग्न जुळवू नका, अरिष्ट संभवते. परंतु मी घरच्यांचा विरोध पत्करून मी हे लग्न केले व मला अस वाटत मी तो आयुष्यातला एकमेव महत्वाचा योग्य निर्णय घेतला होता. `

एकदा नानासाहेब गोऱ्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन जाहीरनामा परिषदेत एक किस्सा सांगितला होता. त्यांच्या कॉलेजजीवनात अनेक मित्रांनी प्रबोधनवादी विचारांनी भारावून जावून हुंडा घेणार नाही , पत्रिका बघणार नाही अशा प्रतिज्ञापत्रकांवर सहया केल्या आणि प्रत्यक्षात जेव्हा पाळी आली तेव्हा हुंडाही घेतला आणि पत्रिकाही बघितल्या. ' माझी इच्छा नव्हती रे पण आमची आजी म्हणाली मी थकले आता! माझ्या डोळ्यादेखत हे कार्य अगदी धूमधडाक्यात झाले पाहिजे. मग आमच्या आईच मन मोडवेना. तिला तरी बिचारीला समाधान मिळू दे. ` अशा अनेक भावनिक पातळयांवर हे प्रबोधन बोलत्या सुधारकांसारखे राहते.

आजचा 'सिलिकॉन व्हॅली` वर्गही पत्रिका न बघण्याची 'रिस्क` सहसा घेत नाहीत. त्या रावनं बघा पत्रिका न बघता लग्न केलं, प्रेमविवाह ना! बुद्धीवादी ना! बसलाय आता बोंबलत. तो जाडया माहीतीये का? अरे त्याने गोऱ्या कातडीवर भाळून लग्न केलं, तरी आई सांगत होती चांगल्या ज्योतिषाला पत्रिका दाखव म्हणून ! पण नाही, अरे जवानी में तो गधी भी सुंदर दिखती है । आता म्हणतोय आईच ऐकलं असतं तर बरं झालं असतं. 'मित्राच्या मुलाच्या लग्नाचे वेळी ज्योतिषाने सांगितलं होत कि हे लग्न ठरवू नका कुटुंबातील व्यक्तिच्या जीवाला धोका आहे. मित्राने दुर्लक्ष केले व लग्न ठरवले. तरी बायको सांगत होती एका जर माझं! आणि काय सांगू! ऐन लग्नाच्या दिवशी नवऱ्या मुलाचा सख्खा भाउ अपघातात गेला. मी स्वतः डोळयांनी बघितलेली हकिगत आहे.`

ज्योतिषानं सांगितलं होतं 'मुलीचं कॅरॅक्टर नीट बघा. ` चौकशी केली तेव्हा कळलं की तिचं ऑफिसातल्या मुलाबरोबर लफडं आहे म्हणूनं. 'मुलगा दिसायला, वागायला स्मार्ट, उच्चशिक्षित, पण ज्योतिषानं सांगितले की मुलगा बाहेरख्याली वाटतो आणि तस्सचं निघालं. ` अशा प्रकारची अनेक उदाहरण आपल्या कानावर पडत असतात. ती खोटीच असतात असे नाही. अयशस्वी वैवाहिक जीवनाच

वाढलेले प्रमाण, घटस्फोट इ. गोष्टी मनावर ताण निर्माण करतात. मग ज्योतिष जे मनाला आधार देतं ते तुमची तर्कबुद्धी वा विज्ञान देत नाही.

आज एकवीसाव्या शतकातल्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या जगात माणूस वैज्ञानिक क्षेत्रात प्रगती करतो आहे. रोज नवनवीन शोध लागताहेत. या पार्श्वभूमीवर ज्योतिषांकडे लग्न जुळतय का ? असे विचारयला येणारा तरूण वर्ग बराच कमी झाला असेल नाही? शिवाय तरूणांमध्ये आता प्रेमविवाह करण्याचे प्रमाण वाढले आहे. ` असे जेव्हा एका ज्योतिषाला विचारले तेव्हा तो म्हणाला , " छे! अहो हल्ली घटस्फोट मिळेल का ? असे विचारायला येणारा वर्ग वाढलयं. विदेशात स्थायिक झालेले लोक जेव्हा भारतात लग्न करण्यासाठी येतात तेव्हा पत्रिका जरूर बघतात. तिकडं विवाहसंस्थेचा अगदी बोऱ्या वाजलायं ना! ``

पत्रिका ही काय फक्त उच्चभ्रू ब्राम्हण समाजाची मक्तेदारी राहिलेली नाही. बहुजन समाजातसुद्धा आम्ही काही आता मागासलेले राहिलो नाही हे दाखवण्यासाठी पत्रिका बघितली जाते. किंबहुना त्या विषयी आग्रही भूमिका घेतली जाते. एक वधूपिता त्याबाबत म्हणतो , " अहो एकवेळ ब्राम्हण समाजात पत्रिका न पहाणे, हुंडा न घेणं, साधेपणाने रजिस्टर विवाह हे प्रमाण वाढत चालले आहे पण आमचे कडे मात्र पत्रिकेचे प्रस्थ वाढत चाललयं. मुलींच शिक्षण आता वाढत चाललयं. त्यामुळे अधिक शिकलेल्या मुलाच स्थळं मिळणं अवघडं. त्यातून पत्रिका जुळण्याचा आग्रह! त्यामुळे लग्न जुळवणं म्हणजे दिव्यचं होउन बसलंय!``

प्रेमविवाहांची संख्या जशी वाढली तशी घटस्फोटांचीही संख्या वाढलीयं. केवळ शारिरिक आकर्षणातून निर्माण झालेले प्रेम हे अल्पजीवी ठरतं. त्यात विवेकापेक्षा भावनेचा पगडा जास्त असतो. तर दुसरीकडे सध्या प्रचलित असलेली विवाह जमवण्याची रीत ही एक प्रकारच्या जुगारासारखी आहे. त्यात केवळ व्यावहारिक गोष्टींसाठी बायोडाटा व 'स्थळ बघण्याचा ` कार्यक्रम ज्यात मुलगा मुलगीचा थोडयाफार प्रश्नोत्तराचा अंतर्भाव. यातून एकमेकाच्या व्यक्तिमत्वाचा काय अंदाज येणार ? तसही 'माणूस` ओळखणे हे अवघड काम. एकमेकाच्या सहवासात राहूनही परस्परांची खऱ्या अर्थान ओळख नसलेली माणसं जगताना दिसतात. तिथं आपल्याला आयुष्याचा साथीदार इतक्या तकलादू पद्धतीने निवडणे कितपतं योग्य आहे ? परिचयोत्तर विवाह ही संकल्पना त्याला चांगला पर्याय होवू शकतो. मैत्रीतून स्वभावाविषयी थोडाफार तरी अंदाज आलेला असतो. त्यामुळे अशा संकल्पनेतून होणारा विवाह हा जुगार होण्याची शक्यता कमी. पण मैत्री व विवाह ही गोष्ट वेगळी. कारण विवाह ही व्यावहारीक गोष्ट आहे. नुसत्या उदात्त कल्पनेने काही जगता येत नाही. सांपत्तिक स्थिती , स्थावर, मानलौकीक, कौटुंबिक स्थिती या गोष्टी वा व्यावहारिक गरजा या महत्वाच्या आहेत. फिल्मी स्टाईल प्रेमाच्या त्याग-त्याग स्पर्धा व्यवहारात कुचकामी ठरतात असे लक्षात आल्यावर ते विवाह साहजिकच अयशस्वी ठरतात. त्यामुळेच 'घटस्फोट मिळेल का ?` असे ज्योतिषाकडे विचारायला जाणारा वर्ग वाढलाय. एका मुलीन सांगितल की आम्ही आपली नॉमिनल पत्रिका बघितली होती. आता लग्नानंतर आठनउ महिन्यांनी

नवऱ्याला एका ज्योतिषाने सांगितले की तुमची पत्रिका जुळत नाही. आता तो घटस्फोट मागतोय. घटस्फोटाच्या शेवटच्या टप्प्यात केस होती. ज्योतिषाला आपल सहज विचारायला गेलो तर त्याने सांगितलं की घटस्फोटाचा योग नाही. आणि काय सांगू महाराजा! केस फिरली. दोघे परत एकत्र आले. अजून त्यांच्या कुरबुरी चालू आहे हा भाग वेगळा. पण भविष्य खरं आले. मनाने विभक्त झालेले परंतु केवळ औपचारिकता म्हणून घटस्फोट घेता न एकत्र रहाणारे पतिपत्नी समाजात दिसतात. प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ कै. वि. म. दांडेकर यांनी ३०० घटस्फोटित युगुलांच्या कुंडल्या संगणकाच्या मदतीने अभ्यासल्या. या अभ्यासात त्यांना फलज्योतिषीय नियमांचे लक्षणीय सातत्य कोठेच आढळले नाही. ज्या समंजस वाटणा या ज्योतिषाच्या मदतीने त्यांनी हा अभ्यास केला त्यालाही ही गोष्ट कबूल करावी लागली. यावरून हे लक्षात येईल की फलज्योतिष म्हणजे अंदाजपंचे दाहोदरसे अशा त हेच्या नियमांचा व ठोकताळ्यांचा एक संग्रह आहे. त्यांचा अनुभव येणे न येणे ही योगायोगाची बाब आहे.

## भविष्यकथनाचा आधार

आम्हाला तर ज्योतिषाचा चांगला अनुभव आला. अमुक ज्योतिषाने आमच्या आमच्या भाचीचे लग्नाचे भाकित अगदी बरोबर वर्तवले होते. फार तर आठदहा दिवसांचा फरक असेल. इतके दिवस जमत नव्हतं कुठे ? मग कसं काय त्याने बरोब्बर वर्तवल ? अशी उदाहरणं आपल्याला नेहमीच ऐकायला मिळतात. संभाव्यताशास्त्र म्हणजे सायन्स ऑफ प्रॉबेबिलिटी. याचा मोठा उपयोग भाकिते वर्तवणाऱ्यांना होतो. याचे नित्य परिचयातले उदाहरण म्हणजे मुलगा होईल की मुलगी होईल याचे भाकीत. ते भाकीत पन्नास टक्के बरोबर येणारच असते , पण सामान्य लोक मात्र भाकीत बरोबर ठरल्याचे श्रेय ज्योतिषाला देतात. असे संभवनीयतेचे कितीतरी अनुभव तुमच्या दैनंदिन जीवनात येत असतात. उदा. तुम्ही एखाद्याची आठवण काढायला आणि ती व्यक्ती तुम्हाला भेटायला किंवा फोन यायला, तुम्ही एखादे गाणे गुणगुणायला आणि नेमके तेच गाणे रेडिओवर लागायला. एखाद्या घटनेची भीती व्यक्त करायला व ती घटना घडायला एकच वेळ येते. पण हीच संभवनीयता जर ज्योतिषाकडून व्यक्त झाली आणि त्याप्रमाणे घटना घडली तर मात्र ते प्रत्यंतर वा प्रचिती. या संभवनियतेविषयी दीड हजार वर्षांपूर्वी भट्ट नारायण लिखित 'वेणीसंहार` नाटकात दुर्योधनाच्या तोंडी एक वाक्य घातले आहे. ते म्हणजे-

**ग्रहाणां चरितं स्वप्नो निमित्तान्युपयाचितम् ।**

**फलन्ति काकतालीयं तेभ्यः प्राज्ञा न बिभ्यति ।।**

अर्थ :- ग्रहांच्या गती, स्वप्न, शकुन, नवस हे काकतालीय न्यायाने फळतात. शहाणे लोक त्यांना घाबरत नाहीत.

वस्तुस्थितीचा अंदाज घेऊन शक्यतेच्या आधारे तारतम्य वापरुन वर्तवलेली 'भाकिते` वेगळी व फलज्योतिषाच्या आधाराने वर्तवलेली भाकिते वेगळी, पण दोन्हींची गल्लत लोक करतात. भाकिते खरी

ठरली तरी त्यामागचा कार्यकारणभाव न तपासताच खरी ठरलेली भाकिते जणू काही ज्योतिषाचा वस्तुनिष्ठ पुरावा म्हणून मानला जातो. अशा प्रकारे संभवनियतेच्या आधारे लग्नाची अचूक भाकिते सांगणाऱ्या ज्योतिषाला पत्रिकेवरुन विवाहीत की अविवाहित हे मात्र सांगता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

माणसाच्या स्वभावाची एक गंमत आहे. देव नवसाला पावला तर ती देवाची कृपा , नाही पावला तर आपलेच नशीब वाईट , असे स्वत:चे समाधान माणूस सहज करून घेतो. ज्योतिषाचे तसेच असते. एखादे चांगले भाकीत बरोबर ठरले की ती ज्योतिषशास्त्राची किमया , खोटे ठरले तर तुमचे नशीबच फुटके! चुकलेली दहावीस भाकिते कुणाला आठवायची नाहीत , पण एक बरोबर ठरलेले भाकीत मात्र लोकांच्या लक्षात पक्के रहाते , आणि त्याची तोंडोतोंडी प्रसिद्धी होत जाते. चुकला तर ज्योतिषी चुकला कारण तो माणूस आहे त्याच्या ज्ञानाला मर्यादा आहेत पण बरोबर आलं तर फलज्योतिष बरोबर आलं ही मानसिकता ज्योतिषांनीच रूजविली आहे.

'लग्नाचं कसं बरोब्बर वर्तवल ?` हे किस्से जसे आहेत तसेच फलाण्या थोर माणसाने आपल्या मृत्यूचा दिवस कुंडलीवरून आधीच वर्तवून ठेवला होता, आणि बरोबर त्याच दिवशी त्याला मृत्यू आला, असेही किस्से अनेकदा ऐकायला मिळतात. ज्याला आपल्या मरणाचा दिवस किंवा वेळ आधीच अचूक कळली तो माणूस थोर , अशी समजूत प्रचलित आहे. ते किस्से खरे असतील तर त्याचा अर्थ असा होतो की कुंडलीवरून मृत्यूची तारीख बरोबर सांगता येते. तसे असेल तर मेलेल्या माणसांच्या पाच-दहा कुंडल्या ज्योतिषाला दिल्या तर निदान एका तरी कुंडलीवरून त्या माणसाच्या मृत्यूची तारीख बरोबर सांगता यायला पाहिजे , पण तसे होत नाही. हा तिढा टाकल्यावर ज्योतिषी कबूल करतात की कुंडलीवरून मृत्यू अचूकपणे वर्तवता येत नाही , पण मृत्यूची शक्यता मात्र वर्तवता येते! 'शक्यता` या शब्दाच्या प्रांतात एकदा शिरल्यावर मूळ प्रश्नाला अनेक फाटे फुटतात , आणि त्यात उत्तर हरवून जाते. सांगायचा मुद्दा हा की , मृत्यूची अचूक भाकिते कुंडलीवरून वर्तवल्याच्या कथा कर्णोपकर्णी फैलावत जातात, पण त्यांची शहानिशा करणे दुरापास्त असते. लोकांना मात्र वाटत रहाते की ज्योतिष किती महान शास्त्र आहे! थोडक्यात संभवनियतेनुसार खरी ठरलेली भाकिते आणि जातकाला मिळालेले मानसिक समाधान वा आधार यालाच तो 'अनुभव` म्हणतो.

## ज्योतिषी कशासाठी ?

फलज्योतिषाकडे येणारे लोक विविध प्रकारचे असतात. कुणी हताश होवून येतो. कुणी मार्गदर्शनासाठी येतो. कुणी उत्सुकतेपोटी येतो. भविष्यात काय होण्याची शक्यता आहे या एकाच प्रश्नाचे उत्तराभोवती सर्व जण येवून ठेपतात. नैराश्यापोटी आलेल्या लोकांना मन व मनाचे आजार याविषयी योग्य माहीती

दिली गेली पाहिजे. चिंता , नैराश्य हे मनाचे आजार आहेत. मानसोपचार तज्ञांचा सल्ला व योग्य ते मानसोपचारावरील औषधांनी ते बरे होतात. शिवाय कौन्सिलिंग सेन्टर्स हे पण तुमच्या समस्या समजावून घेवून त्यावर कायदेशीर व व्यावहारिक उपाययोजना सुचवतात. सर्वांचे सर्व प्रश्न सुटतीलच असं नाही. वैज्ञानिक दृष्टिकोणाचा अवलंब केला तर तर्कबुद्धी , विवेक व आत्मपरीक्षण यांच्या सहायाने आपले काही प्रश्न सुटू शकतात. अनिश्चितता ही सर्वांसाठीच आहे. ती पचवायला शिकलं पाहिजे. जी गोष्ट आपल्या हातात नाही त्या पेक्षा जी गोष्ट आपल्या हातात आहे तिचा विचार केला पाहिजे. प्रयत्न ही बऱ्याच अंशी हातातली बाब आहे. भविष्याविषयी उत्सुकता असणे स्वाभाविक असले तरी त्यासाठी फलज्योतिषाचा आधार घेवून त्यावर निर्णय घेणे हे संयुक्तिक नाही. फलज्योतिषाकडे वळण्याचे मूळ कारण तपासून पाहिले तर आपल्याला अदृष्टाची भीती व अज्ञाता विषयी वाटणारे गूढ हेच आहे. परंतु विवाहाच्या अनुषंगाने पत्रिका पहाताना या भीतीपोटी कित्येकदा सुस्पष्ट व्यावहारिक गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याचा माणसांचा कल दिसून येतो व पत्रिका जुळवण्याला निर्णायक महत्व दिले जाते. यातून निर्माण होणाऱ्या समस्यांना विवाह जुळविण्यासाठी व्यवहारोपयोगी असे पर्याय दिले तर ज्योतिषाकडे जाणारा हा ओढा नक्कीच कमी होईल.

लहानपणापासून मनावर झालेल्या संस्कारांचे जोखड फेकून देणे अवघड असते. ज्योतिषांची भाकिते खरी ठरल्याच्या गोष्टी नेहमी कानावर पडत असतात. दोन-अडीच हजार वर्षांच्या या पुराण्या शास्त्राला एकदम बोगस कसे म्हणावे अशी धास्ती वाटते. लग्नाच्या बाबतीत जोडीदार कसा मिळेल ? कुणास ठाउक? या अनिश्चिततेपोटी माणसं पत्रिका बघतात. वास्तविक हा ही मार्ग किती अनिश्चित आहे. हे त्यांना समजत असतं पण उमगतं नसतं. यात एक मोठी सोय होते. अपयशाचे खापरं फोडायला ज्योतिषाचा आधार रहातो. स्वत:वर फारशी जबाबदारी यंत नाही. वास्तविक ही अनिश्चितता संपवण्यासाठी आणखी व्यवहार्य पर्याय आपणचं शोधायला हवे आहेत. त्यातला संकोच अनावश्यक ताण कसा संपवता येईल याचा विचार करायला हवा आहे. पण जुना धोपटमार्ग सोडून नव्या वाटेने जायची आसं लागल्यानंतरच माणसानं प्रगतीची नवनवी शिखरं पादाक्रांत केली आहेत. सुरूवातीला ठेचकाळत जाणारे मागच्यांसाठी नवे घाटमार्ग निर्माण करीत असतात.


# दिवंगत ज्योतिषचिकित्सक व टीकाकार श्री. माधव रिसबूड यांचा लेख

## पत्रिका पहाण्याचा आग्रह समंजसपणाचा आहे का ?

माझ्या नात्यातली ही मुलगी. एका प्रख्यात कंपनीत २५ हजार रुपये पगार मिळवणारी. दिसायला देखणी, स्मार्ट. पण गेली दोन वर्षं तिचं लग्न जुळत नव्हतं , याला कारण तिची पत्रिका ! कडक मंगळ आणि मूळ नक्षत्र. मोजून चाळीस ठिकाणी पत्रिका जुळत नाही म्हणून तिला नकार आले. वडिलांनी तिची पत्रिका अनेक ज्योतिष्यांना दाखवली. सगळयांनी ठामपणे सांगितलं की डिसेंबर २००२ च्या आधी तिचा विवाहयोग नाही. पण काय आश्चर्य, याच डिसेंबर महिन्यात तिचं लग्न होऊनसुद्धा गेलं!

ज्योतिषशास्त्र खरं की खोटं यावर आपली नक्की मतं ज्यांनी बनवलेली नाहीत अशा वाचक-भगिनी पुष्कळ असतील. हा लेख वाचून त्यांना आपलं मत बनवणं सोपं जाईल. ज्यांचा या शास्त्रावर ठाम विश्वास आहे त्यांचे मत-परिवर्तन झाले नाही तरी हा लेख त्यांना विचार करायला प्रवृत्त करील. या लेखातले प्रतिपादन तज्ज्ञ ज्योतिष्यांनाही खोडून काढता आलेले नाही.

या शास्त्रातली गृहितके काल्पनिक व सामान्य विवेकबुद्धीला न पटणारी आहेत. ऍबसर्ड हे विशेषण त्यांच्यासाठी योग्य होईल. त्यांपैकी काहींची माहिती मी इथे देणार आहे. सोबतच्या आकृतीमुळे माझे म्हणणे समजायला सोपे जाईल.




खुलासा:- आकृतीतील स्थिती दररोज एकदा , दिवसा किंवा रात्री केव्हाही येऊ शकते. राहू एकाच वेळी चार स्थानात उपस्थित आहे. राहूचे प्रभाव पृथ्वीतून आरपार पलीकडे जातात असे मानावेच लागते.

**ग्रहांची फले जन्मकुंडलीतल्या ग्रहांच्या स्थानानुरूप मिळतात हा सिद्धांत** :- एकाच वेळी चार ठिकाणी जन्मलेल्या चार मुलांच्या संक्षिप्त कुंडल्या इथे दाखवल्या आहेत. राहू बर्लिनला ९ व्या घरात , मुंबईला ७ व्या घरात , टोकियोला ५ व्या घरात व लॉस एंजेलिसला १ ल्या घरात पडला आहे. या मुलांना चार प्रकारची फले राहू देतो असा या शास्त्राचा सिद्धांत आहे. ९ वे घर धार्मिक बाबी व प्रवास यासंबंधी, ७ वे घर वैवाहिक बाबींचे, ५ वे घर संततीबाबतचे आणि पहिले घर पिंड-प्रकृतीबाबतचे. अशा प्रकारची फले राहू देतो असे हे शास्त्र मानते. तसे करण्यासाठी राहूला कोणकोणत्या गोष्टी करायला पहिजेत ते पाहू. प्रथम आपल्या प्रभावाचे पृथक्करण करून त्यातले १२ घटक अलग करायला पाहिजेत. प्रत्येक घटक एकेका स्थानाचे फल देणारा असतो. हे १२ घटक पृथ्वीवर योजनाबद्ध रितीने वितरित करायला पाहिजेत, ( उदाहरणार्थ, ७ व्या प्रदेशावर ७ व्याच स्थानाची फले देणारा घटक व ५ व्या प्रदेशावर ५ व्याच स्थानाची फले देणारा घटक वितरित व्हायला पाहिजे.) तरच स्थानानुरूप फले राहू त्या मुलांना देऊ शकेल. ही पृथक्करणाची व वितरणाची क्रिया एकतर राहू स्वतःच्या बुद्धीने करीत असेल नाही तर काही अज्ञात भौतिक कारणामुळे त्या क्रिया आपोआप घडत असतील असे म्हटले पाहिजे. परंतु, मुळात राहू हा एक काल्पनिक बिंदू असल्यामुळे त्याचा ज्योतिषीय प्रभाव भौतिक स्वरूपाचा असणे शक्य नाही, म्हणून त्या प्रभावाचे पृथक्करण व वितरण भौतिक कारणामुळे होते हे म्हणणे ऍबसर्ड ठरते. बरे , राहूला दैवी सामर्थ्य असते असे म्हणावे तर तेही ऍबसर्ड दिसते. म्हणून शेवटी, स्थानानुरूप ग्रहांची फले मिळतात हा सिद्धांतच ऍबसर्ड आहे असे म्हणावे लागते.

**ग्रहांच्या दृष्टीचा सिद्धांत**:- काही ग्रहांना प्रत्येकी एक दृष्टी व काही ग्रहांना अनेक दृष्टी असतात , त्या दृष्टी म्हणजे एक प्रकारचे ज्योतिषीय प्रभावच असतात , या दृष्टी ठराविक स्थानावरच पडतात व त्यानुसार फले जातकाला मिळतात असा या शास्त्राचा सिद्धांत आहे. मला दोन कारणासाठी तो ऍबसर्ड वाटतो. एक कारण असे की, या दृष्टी ज्या स्थानावर पडतात ती स्थाने आकाशाच्या पोकळीत असतात असे हे शास्त्र मानते. पण तसे मानले तर त्या दृष्टींचा परिणात जातकावर होतो हे म्हणणे ऍबसर्ड वाटते. बरे, त्या दृष्टी कागदावरच्या कुंडलीतल्या स्थानावर पडतात व परिणाम करतात असे म्हणावे तर तेही ऍबसर्ड दिसते. दुसरे कारण असे की, राहूला ज्या आठ दृष्टी असतात ( असे हे शास्त्र मानते ) त्या ठराविक स्थानावर पाडण्यासाठी एक तर राहूला बुद्धी असली पाहिजे किंवा काही गूढ भौतिक कारणामुळे तसे घडत असले पाहिजे. पण हे दोन्ही पर्याय मला अ‍ॅबसर्ड वाटतात. म्हणून , हा दृष्टीचा सिद्धांतही ऍबसर्ड आहे असे मला वाटते.

**या शास्त्राच्या मूलभूत तत्वाशी विरोधी असलेला महादशा-सिद्धांत**:- आकाशातली राशीगत ग्रह-स्थिती विशिष्ट वेळी जी काय असेल तिच्यामुळे पृथ्वीवरील घटना त्यावेळी घडते अशी या शास्त्राची मूलभूत संकल्पना आहे. तिच्याशी सर्वस्वी विसंगत असा महादशा-पद्धत नावाचा सिद्धांत या शास्त्रात आहे. या सिद्धांतातील ग्रहांचा अनुक्रम आणि त्या ग्रहांचे दशाकाल यांचे काहीही नाते आकाशातील ग्रह-स्थितीशी जोडून दाखवता येत नाही. तरीही ती पद्धत भाकिते वर्त्रवण्यासाठी वापरली जाते. यावरून या शास्त्राला कसलीही शास्त्रीय बैठक नाही हे उघड दिसते.

ज्यांना वस्तुमान नाही, ज्यांना केवळ कल्पना-गम्य किंवा अमूर्त अस्तित्व आहे अशा घटकांना काही विशिष्ट गुणधर्म आणि प्रभाव असतात असे म्हणणे ऍबसर्ड असले तरी हे शास्त्र अशा काही घटकांना गुणधर्म व प्रभाव आहेत असे मानते. ते घटक असे आहेत :- स्थाने किंवा घरे, राशी व नक्षत्रे, आणि राहू व केतू हे काल्पनिक बिंदू.

स्थाने म्हणजे आकाशाच्या पोकळीचे काल्पनिक १२ विभाग असे मानतात. यांना गुणधर्म असतात असे मानणे ऍबसर्ड आहे. राशी व नक्षत्रे म्हणजेही एका कल्पनिक वर्तुळाचे अनुक्रमे १२ व २७ कंस किंवा आर्क्स्. रास म्हणजे ३० अंश मापाचा कंस व नक्षत्र म्हणजे १३ अंश व २० कला मापाचा कंस. आपण आकाशात पहातो ती राशी-नक्षत्रे वेगळी व हे शास्त्र विचारात घेते ती राशी-नक्षत्रे वेगळी. सर्वसामान्य लोकांना हे ठाऊक नसते. ज्योतिष्यांना ठाऊक असले तरी तसे उघडपणे सांगणे त्यांना गैरसोयीचे असते. सायन राशी व निरयन राशी हे शब्द अनेकांनी ऐकले असतील. त्या राशींची आकाशातील ठिकाणे वेगळी असतात , पण त्यांचे गुणधर्म व प्रभाव यांच्यामध्ये काहीही फरक नाही असे ज्योतिषीलोक मानतात! हे ऍबसर्ड नव्हे तर काय ? राहू-केतूमुळे ग्रहणे होतात अशी गैरसमजूत ज्योतिषीलोकांनी हेतूपूर्वक फैलावली आहे. तिचा उपयोग ते राहू-केतूंच्या काल्पनिक प्रभावांचे समर्थन करण्यासाठी करतात. वास्तविक पहाता ग्रहण होते त्यावेळी हे बिंदू कित्येकदा १०-१२ अंशसुद्धा दूर असू शकतात. चंद्र व पृथ्वी यांच्या कक्षा जर एकाच पातळीत असत्या तर हे बिंदू उद्भवलेच नसते , आणि त्या परिस्थितीत दर पौर्णिमेला एक खग्रास चंद्रग्रहण आणि दर अमावास्येला एक खग्रास किंवा कंकणाकृती सूर्यग्रहण बघायला मिळाले असते. मग ग्रहणांशी या राहू-केतूंचा संबंधच कुठे येतो ? ज्योतिषीलोक या शास्त्राच्या समर्थनासाठी काय वाटेल ते युक्तिवाद करीत असतात.

सारांश, फलज्योतिष म्हणजे केवळ काल्पनिक गृहितकृत्यावर उभे केलेले एक अगडबंब शास्त्र आहे. त्याच्या आधारे वर्तवलेली भाकिते योगायोगाने जशी खरी ठरतात तशीच खोटीही ठरतात. अशा शास्त्राचा आधार घेऊन मुलामुलींच्या पत्रिका जुळत नाहीत एवढया एकाच कारणासाठी चांगली अनुरूप स्थळे नाकारणे हे असमंजसपणाचे लक्षण आहे.

-------------------------------------